परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १९, अंक ५. डिसेंबर २०२५ – जानेवारी २०२६

### मुखपृष्ठाविषयी

आठवणींच्या फुलांचं एक बरं असतं. कधीही वाटलं की त्याच्या सुवासाचा आनंद घ्यावा, ती कधी कोमेजत नाहीत. ९ ऑक्टोबर रोजी भ्राता बृजमोहनजींनी दीर्घ आजारानंतर देह ठेवला. सेक्रेटरी जनरल, ओ.आर.सी.डायरेक्टर, ब्रह्माकुमारीजच्या कार्यकारी समितीमधील एक मुख्य पद भूषविणारे भ्राताजी कायम टवटवीत चेहऱ्याने शेवटपर्यंत वावरले. योगस्थः कुरू कर्माणि या तत्त्वानुसार कायम ईश्वरी सेवारत असत. सहजपणे त्यांचे अनुभवसिद्ध मार्गदर्शन घेता येत असे. खुसखुशीत विनोदातून संवादातील ताण–तणाव दूर करण्यात त्यांचा हातखंडा होता. अशा अनेक सुखद आठवणींचे कधीही निर्माल्य होणार नाही. भ्राताजींना अमृतकुंभतर्फे श्रद्धांजली.

– प्रकाशिका




१. संपादकीय...उमद्या स्वभावाचे राजयोगी भ्राता बृजमोहनजी — २
२. परीकथा (भाग २१) — ४
३. बकुळगंध — ६
४. गुलजार दादीजींसोबत ज्ञानचर्चा — ७
५. सुरक्षा कवच — १०
६. जीवन एक प्रभूप्रसाद — ११
७. शांतीवन निर्मितीत सिंहाचा वाटा – भूपाल भाईजी! — १३
८. पर्यावरणासंबंधी काही वेचे — १७
९. यशाचे अचूक उपाय — १८
१०. मृत्यू एक गूढ — २१
११. बोधकथा — २५
१२. स्पार्कमधील अनुभव — २७
१३. जरा विचार करून पहा — २८


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com


**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व)–४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), Pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye

वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com

संपादकीय ...

# उमद्या स्वभावाचे राजयोगी भ्राता बृजमोहनजी



आपल्या संपर्कात अनेक माणसे येतात, मात्र जी मंडळी काही ना काही छाप उमटवून जातात तीच स्मरणात राहतात. किंबहुना जे आपल्याला काही ना काही देऊन जातात ते विशेष करून लक्षात राहतात. भ्राता बृजमोहनजी त्यापैकीच एक होते. व्यक्तिशः मला दोन-तीन वेळा त्यांच्याशी बोलायचा किंवा देव-घेव करायचा योग आला. इतर वेळी त्यांचे भाषण, ज्ञानयुक्त मार्गदर्शन इत्यादींचा लाभही झाला. भ्राताजी अनेक वर्षे दिल्लीत राहिले आणि आयुष्याचा सूर्य मावळतीकडे झुकायला लागल्यावर आबूत स्थिरावले होते. आबू मुख्यालय असल्याकारणाने एकाच जागी असूनही ते अनेकांना भेटण्यास सहज उपलब्ध असत.

सहज स्वभाव आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वा पदाचा दबाव दुसऱ्यावर अजिबात येऊ न देता सहजपणे भेटणे, हे त्यांच्या स्वभावाचे मोठे वैशिष्ट्य होते. एकदा शांतिवनामध्ये संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर रमेशभाईंच्या कार्यालयात मी प्रवेश करायला आणि बृजमोहनभाई बाहेर पडायला एकच गाठ पडली. माझी त्यांच्याशी व्यक्तिगत ओळख पुसटशीदेखील नाही. तरी त्यांनी मला हसून अभिवादन केले. आपल्या हातातील एक पेढा अर्धा माझ्या हातावर ठेवला आणि 'ओम शांती' म्हणत गेले देखील. एका सुखद धक्क्याने मी किंचितसा भांबावलो आणि भानावर आलो. छानशी वाऱ्याची झुळूक अंगावरून जावी तद्वत झाले. पूर्वी मुलुंड सेवाकेंद्राच्या वर्धापनानिमित्त भ्राताजी दोन-चार वेळा ठाणे-मुलुंड येथे येऊन गेले होते. त्यादरम्यान भ्राताजींशी मर्यादित देव-घेवच घडली.

गेल्या वर्षी त्यांच्या कार्यालयात अमृतकुंभच्या 'शिवरात्र विशेषांकाच्या' निमित्त शुभेच्छा घेण्याकरिता जाणे झाले. त्यावेळेसही त्यांची तब्येत थोडी-फार वयोमानानुसार नरम-गरम होती. मात्र चेहऱ्यावर त्याचा लवलेशही नव्हता. त्यावेळीही मोजक्या शब्दांत मी कामाचे स्वरूप सांगितले, त्यांनी लगेचच आपल्या सहकाऱ्याला सूचना केली आणि मला हवे ते देण्याचे आश्वासनही दिले. गीतेवरचे त्यांचे विवेचन रेकॉर्ड करण्याकरिता आलेला कॅमेरामन आणि इतर मंडळी एकाच वेळी येऊन उभी होती, माझ्यासारखेच दोन-पाचजण काही ना काही किरकोळ कामे घेऊन समोर उभे होते. एकजण फायनान्ससंबंधी कागदपत्रे घेऊन आला होता. या सगळ्या धामधुमीत त्यांच्या मनाची शांत-स्थिर स्थिती ठशीव होती. सर्वसामान्य निरीक्षणानुसार पाहिले तर नव्वदीत पोहोचलेल्या माणसांना इतके व्यग्र क्वचितच पहायला मिळेल. त्यातही इतके स्थिर असणे दुर्मीळच म्हणावे लागेल. योग्याचे कर्मकुशल जीवन प्रकट रूपात पहायला मिळाले. वय वाढले की भोवतालचा कलकलाट, गर्दी सहन करण्याची माणसाची शक्ती कमी होत जाते. भ्राताजींचे तसे नव्हते. वयानुसार अनेक आव्हाने येत जातात मात्र बृजमोहनजी त्यापासून अप्रभावित होते. ब्राह्ममुहूर्तावर राजयोगाची नित्य साधना त्यांनी कधीही चुकवली नाही. कर्तव्यकठोर होते मात्र आंतरिक ओढ निजधामाची होती आणि ते जवळच्या मंडळींना जाणवत होते. छोट्या-मोठ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून जीवनाच्या मूळ हेतुकडे सर्वांचे ध्यान कसे गुंतवून ठेवता येईल यासाठी ते दक्ष होते. गीतेचे तत्त्वज्ञान, आजच्या जीवनाशी त्याचा असलेला संदर्भ आणि उपयोगिता, खरा ज्ञान-दाता कोण इत्यादी विषयांवर त्यांचा सखोल अभ्यास होता आणि त्याचे अनेक भाग ब्रह्माकुमारीजच्या वाहिनीवरून वेळोवेळी प्रसारित झाले आहेत ते फार मननीय आहेत. भ्राताजी नेहमी जीवनाविषयीची तीन तत्वे उद्धृत करत.

• **Nothing exists for itself** म्हणजे या जगात कुठलीही वस्तू किंवा

कोणाचेही अस्तित्व हे फक्त स्वतःपुरते मर्यादित नसते. ते नेहमीच अन्य कोणासाठी तरी उपयुक्त असते. एखादी खुर्ची एका जागी ठेवली आहे. तिचा कुणी उपभोगकर्ता असेल तर त्या खुर्चीच्या अस्तित्वाला अर्थ आहे अन्यथा ते व्यर्थ आहे.

• **You can't own anything in this world. You can ONLY use it.** हे शाश्वत सत्य सगळ्यांना माहीत आहे; पण त्याच्या घनगंभीर अर्थामध्ये रममाण होणे ही जणू साधना आहे. भ्राताजी त्यात मग्न होत असत. या जगात कुठल्याही वस्तूवर आपण कायम स्वरूपी मालकी हक्क प्रस्थापित करू शकत नाही. जोवर श्वास आहे तोवर त्याचा उपभोग घेऊ शकतो. अर्थात कुठल्याही गोष्टीत मन-बुद्धी गुंतवता कामा नये. उपयोग करावा; पण नष्टोमोहः बनून जगायचा प्रयत्न असावा.

•**Things are things.** वस्तू या केवळ वस्तू आहेत, भौतिक जगत, वस्तू जीवनातील अविभाज्य घटक आहेत; पण त्याचे महत्त्व मर्यादित असू द्यावे. कुठलेही ऐहिक सुख / ऐश्वर्य आपल्याला सदा सर्वदा सुखी ठेवू शकत नाही. शाश्वत सुख, आत्मानुभूतीत दडले आहे.

• **Life does not give you what always you want** – आपल्या इच्छेनुसारच सगळे घडेल असे नाही. प्रामाणिक प्रयत्नांनंतर जे काही कर्मफल समोर येईल ते सहर्ष स्वीकारावे. त्यातच जीवनाचा खरा आनंद समावलेला आहे.

९ ऑक्टोबर २०२५ रोजी भ्राताजींनी आपला देह ठेवला. त्यांच्या समीप राहणाऱ्या अनेकांनी आपले अनुभव मांडले. दिल्लीच्या विजयदीदी सांगतात – 'मला आठवते, फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कामकाजाच्या सोयीसाठी वेगवेगळ्या सेवाकेंद्रावर राहण्याकरीता आम्हा बहिणींना ठिकठिकाणी जावे लागे. माझ्या सोबत राहणाऱ्या बहिणींनाही जावे लागत होते आणि त्यावेळी मला थोडा एकटेपणा जाणवू लागला. माझ्या जीवाची घालमेल भ्राताजींनी ताडली आणि मला पटकन म्हणाले, बहनजी तुम्हाला कधीही काही मदत लागली तर मला सांगा मी आहे ना दिल्लीतच. मी येईन तुमच्या मदतीला. आणि खरोखरीच त्यांनी मोठ्या भावाप्रमाणे मला वेळोवेळी मदत केली, मार्गदर्शन केले.'

ओ. आर. सी.च्या प्रमुख आशादीदी – त्यांच्या समीप राहण्याचा अनुभव फार छान शब्दांत सांगतात – भ्राताजी अनेक गुणांचे प्रकट रूप होते. साधेपणा होता मात्र त्यात आध्यत्मिक उच्चता उठून दिसत असे. एकदा असे झाले – आम्ही काही कामानिमित्त सरकारी कार्यालयात गेलो होतो. तिथे एका स्त्री अधिकाऱ्याशी आमचे काम होते. कामासंबंधी बोलणे झाल्यावर आपल्या प्रथेप्रमाणे आम्ही छोटीशी भेट आणि ईश्वरी प्रसाद देऊ केला. त्या स्त्रीने तो जरा फणकाऱ्यानेच नाकारला. भ्राताजींनी सांगण्याचा प्रयत्न केला, हा प्रसाद आमच्या योगी, तपस्विनी बहिणींनी स्वतः बनविला आहे. प्रेमळ आग्रहास विनाकारण झिडकारणाऱ्या अधिकाऱ्याचे वागणे पाहून भाईजींनी पुढे केलेला प्रसादाचा खोका मिटला आणि शांत शब्दात म्हणाले, हरकत नाही. ज्याला आमच्या भावनांची कदर नाही त्याच्यासाठी हा प्रसादही आम्ही असाच ठेवून जाऊ शकत नाही. देऊ केलेला प्रसाद त्यांनी परत घेतला, त्यांच्या भावना बिघडल्या नव्हत्या मात्र वागण्यात एक खंबीरपणा होता. हा ईश्वरी प्रसाद आहे त्याचा अनादर करणाऱ्या व्यक्तीच्या कदाचित भाग्यात नाही तर आपण ते असेच व्यर्थ जाऊ देणार नाही हा निग्रह होता.

भ्राताजी म्हणजे काटकसरीचे मूर्तिमंत रूप होते. एकदा त्यांच्या चष्म्याची काडी मोडली. सोबत राहणाऱ्या भावाला त्यांनी सांगितले, हा जरा दुरुस्त करून मला द्याल का? त्या भावाने दुकानात नेल्यावर दुकानदार म्हणाला, 'आता अशा चष्म्याची फॅशन गेली त्यामुळे याची काडी आता आमच्याकडे नाही. त्यापेक्षा नवा चष्मा घ्या.' तो भाऊ हात हलवत परत आला. भ्राताजी म्हणाले, 'असे कसे होईल, चला मी येतो तुमच्या सोबत, मी सांगतो त्याला.' ते दोघे पुन्हा दुकानात गेले. दुकानदाराने तशाच प्रकारचे पर्याय सुचवले. भ्राताजींनी त्याला जुने चष्मे काढायला लावले. त्यातली बऱ्यापैकी जुळणारी काडी बसवायला सांगितली. दुकानदार म्हणाला, 'नवा चष्मा स्वस्तात बनवून देतो' तर ते म्हणाले, 'अरे मी पन्नास हजाराचा चष्माही घेऊ शकतो; पण जिथे दहा-वीस रुपयात काम होणार आहे तिथे मी उगाचच पैसे वाया का घालवू? ऐपत आहे म्हणून उधळ-माधळ करणे मला जमायचे नाही.' भ्राताजी जेव्हा कुणा विशेष व्यक्तींना भेटायला जात तेव्हा त्यांच्याशी काय बोलायचे, कुणी काय बोलायचे, कुणी त्यांना ईश्वरी भेट द्यायची, प्रसाद कुणी द्यायचा याविषयी फार शिस्तबद्ध असत. तसेच भेटणारी व्यक्ती स्त्री असेल आणि राखी पौर्णिमेसारखा सण

(पृष्ठ क्र.१२ वर)

# परीकथा

(भाग २१)

# गीता ज्ञानदाता

ब्र.कु. रेखा, देगलूर



त्यादिवशी आम्ही सर्वजण गावी दिवाळीनिमित्त गावी जाणार होतो. राधा सकाळी लवकरच उठली होती. मी (शामा) आश्चर्याने तिच्याकडे पाहत म्हणाले, ''राधा, आज गावी जायचं म्हणून लवकर उठलीस ना बाळा! आणि तयार सुद्धा झालीस एवढ्या लवकर!'' तेवढ्यात तिचे बाबा राधेला जवळ घेत म्हणाले, ''बाळा गावाकडे गेल्यावर काय काय मज्जा करणार?'' राधा म्हणाली, ''बाबा गावाकडे गेल्यावर माझ्या मैत्रिणीना भेटणार, मग शेतात जाणार, सीताफळे खाणार, झोक्यावर बसणार. झोका की नाही फार फार उंच जातो. असं वाटतं की मी आभाळालाच हात लावत आहे.'' बाबा म्हणाले, ''चल मग आता उशीर नको करायला नाहीतर गाडी चुकेल, आपण लवकर निघूया.'' असं म्हणत बाबांनी सामान बाहेर आणले. गर्दी थोडीशीच होती पावसाची थोडी रिमझिम चालूच होती. आम्ही बस स्टॉपवर पोहोचलो थोड्यावेळाने गाडी आली. तिघांनाही आम्हाला सीट मिळाली मग आम्ही निवांत बसलो मी एक दीर्घ श्वास घेत म्हणाले, ''बरं झालं बाबा आपल्याला सीट मिळाली.'' खिडकीजवळ बसण्यास मिळाल्यामुळे राधाही आनंदली होती. मग थोड्या वेळाने राधा म्हणाली, ''आई मला पण खूप तहान लागलीय.''

बाजूलाच एक आजी-आजोबा होते. आजीला सीट मिळाली परंतु आजोबांना मात्र मिळाली नाही ते उभेच होते म्हणून राधेच्या बाबांनी त्यांना बसायला दिले. राधा आजोबांच्या जवळ जात म्हणाली, ''आजोबा तुम्ही कुठे जात आहात.'' आजोबा म्हणाले, ''इथे जवळच्याच स्टेशनला आम्ही उतरणार.'' राधा म्हणाली, ''आजोबा एखादी गोष्ट तरी सांगा ना.'' आजोबा हसले व म्हणाले, ''बाळा आता कुठली गोष्ट सांगू विसर पडतो आता या वयात. त्यापेक्षा तूच सांग एखादी गोष्ट. तुझ्या गोष्टीमुळे थोडसं मन हलकं तरी होईल.'' राधा म्हणाली, ''आजोबा मी तुम्हाला सांगेन पण मला एक प्रॉमिस करा की तुम्हाला रोज माझ्या लाडक्या शिवबाबांची आठवण करावी लागेल कराल ना.'' आजोबा म्हणाले, ''बाळा आधी तुझ्या शिवबाबांची तरी ओळख होऊ दे मग मी आठवण करीन राम कृष्ण हरी.'' असं म्हणत आजोबा हसले. राधा म्हणाली, ''मी आज माझ्या स्वप्नातल्या परींची गोष्ट तुम्हाला सांगते.'' बाजूची आजी चेहऱ्यावर आश्चर्य करत म्हणाली, ''स्वप्नातली परीची कथा बघूया तर बाळा कोणती कथा आहे ती.'' मग राधेने पहिल्यापासूनच्या गोष्टी सांगितल्या. आजोबा म्हणाले, ''बाळा पहिली गोष्ट तर मला खूप आवडली मला स्वतःची ओळख मिळाली.'' साऱ्या गोष्टी तिने सांगितल्या. राधा म्हणाली, ''आजोबा कालच परीने मला पुढची गोष्ट सांगितली. ती म्हणाली श्रीकृष्ण देवता आणि शिव परमात्मा आहे.'' आश्चर्याने आजी राधाला म्हणाली, ''श्रीकृष्ण देवता आणि शिव परमात्मा हे काय आहे?'' यावर राधा म्हणाली, ''परीने मला एक प्रश्न विचारला, सर्व शास्त्र शिरोमणी गीता ज्ञानदाता कोण आहे?'' मी परीला म्हणाले, 'श्रीकृष्ण!' यावर परी म्हणाली, ''बाळा द्वापरयुगात कुरुक्षेत्राच्या रणांगणावर युद्ध करते वेळेस दोन्ही कौरव व पांडवाच्या मधोमध थांबून श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगितली असेच तू टीव्हीवर पाहिलेस ना?'' राधा म्हणाली, ''मला पण थोडं थोडं माहिती आहे तरी तू सांग ना ग परी.'' परीने सुरुवात केली, ''बाळा भगवद्गीता द्वापरयुगात नाही तर संगमयुगात सांगितली गेली आहे. गीता ज्ञान देण्याचा एक उद्देश होता. पृथ्वीवर अधर्म द्वापारयुगापेक्षा कलियुगात अधिकाधिक वाढत गेला. तेव्हा एक धर्माची स्थापना करणे हाच उद्देश होता. अधर्मविनाश तसेच सत्य धर्माची व दैवी संप्रदायाची स्थापना व्हावयास हवी

होती परंतु सर्वजण जाणतात आणि मानतात सुद्धा द्वापर युगानंतर कलियुगाचीच सुरुवात झाली. धर्माची तर अधिक ग्लानी झाली आहे. लोकांचा स्वभाव तमोप्रधान आसुरी वृत्तीचा झालेला आहे.'' मी फारच आश्चर्याने परीला विचारले, ''हे तर परी तू अगदी बरोबर सांगत आहेस.'फ

परी पुढे म्हणाली, ''बाळा तू जेव्हा महाभारत पाहत होतीस तेव्हा श्रीकृष्णाचा जन्म पाहिला. त्यावेळेस घोर अंधकाराचा विजेचा कडकडाट कारागृहात वसुदेव देवकीच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म झाला. बाळा आजही तीच स्थिती आहे. की संपूर्ण अज्ञान अंधकार अधर्माची खूप वाढ झालेली आहे. आसुरी वृत्तीची वाढ झालेली आहे. याच वेळेस अज्ञान रुपी अंधकार खूप वाढलेला आहे अशा वेळेस भगवंताचा अवतार होतो. अवतरणाचा यथार्थ परिचय हाच आहे की तो अवतरीत होऊन एक धर्माची स्थापना करतो ज्ञान देऊन मानवी जीवनाची सद्‌गती करतो नरास नारायण बनवितो. भगवान तर सृष्टीचा चैतन्य बीजरूप आहे म्हणूनच त्याच्या आगमनानंतर विश्व परिवर्तनाचे कार्य घडवून तो आणतो. राधा आपण दिवाळीला काय काय करतो सांग बरं!'' राधा म्हणाली, ''लक्ष्मीपूजनाच्या आदल्यादिवशी आम्ही खूप साफसफाई करतो. त्यादिवशी मात्र खूप दिवे लावतो. जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश असतो.'' यावर परी म्हणाली, ''हो बाळा आजही तेच होत आहे की हा जो अज्ञानरुपी अंधकार आहे. अपवित्रता धर्माची ग्लानी अशा जागी देवतांचे पाऊल कसे पडेल. म्हणूनच परमात्म्याच्या अवतरणानंतर सृष्टीचा कायापालट होत आहे. या अंधाकारातून प्रकाशाकडे आपण जात आहोत. पवित्रता पालन करण्यामुळे धर्माची स्थापना, संसार परिवर्तनाचे कार्य सुरू झाले आहे. नंतर पवित्र दुनियेत राधा कृष्णाचा जन्म होईल. बाळ राधा सर्व शास्त्र शिरोमणी श्रीमद् भगवद्गीतेचा ज्ञानदाता परमपिता शिव परमात्मा आहे. तोच कलियुगाच्या अंतिम समयी सर्वांना ज्ञान देऊन सद्‌गती करतो. त्या ज्ञानाद्वारे मानव देवत्व प्राप्त करतो. देवतांमध्ये सर्वोच्च पद म्हणजेच श्रीकृष्ण आणि राधा किंवा लक्ष्मी नारायण. मानवाच्या सर्वोच्च पवित्र स्थितीचे रूप हेच आहे. पवित्र देवता सत्ययुगात होऊन गेल्या द्वापर युगात नाही हेच अधिक तर्कसंगत वाटते. शिवपिता निराकार आहे. सुखदुःख, जन्म मरणाच्या चक्रात मानव येतो, शिव परमात्मा येत नाही.'' एवढं बोलून झालं की लगेच परी आकाश मार्गातून दिसेनाशी झाली. मग लगेच मात्र मला जाग आली. आजी आजोबा मात्र थक्क होऊन राधेची कहाणी ऐकत होते. आजोबांनी तर राधेच्या पाठीवर शाबासकी दिली आणि म्हणाले, ''बाळा एकदम छान सांगितलंस मनाला खूप आराम मिळाला. आणि हा प्रवास कसा गेला तेच काही कळलं नाही. बाळा तुझी गोष्ट ऐकण्यासाठी मी नक्कीच गावाकडे येईन आणि ही गोष्ट तर मुळीच विसरणार नाही.'' राधा म्हणाली, ''आजोबा विसरायचं नाही. तुम्ही पण सर्वांना सांगाल ना! सर्व गोष्टी सर्वांना सांगितल्यात तर मग ज्ञानाचा प्रसार होईल. आणि अज्ञान अंधकार दूर होऊन जाईल मला प्रॉमिस करा.'' राधेने हात समोर केला व आजोबांनी हातात हात देऊन तिला प्रॉमिस केलं व तोपर्यंत आजोबांचे गाव सुद्धा आले. ''आजोबा तुम्ही आमच्या गावी नक्की याल ना!'' राधा म्हणाली. आजोबा म्हणाले, ''हो बाळा मी नक्की येईन. हा गीतेचा विषय खूप गहन आहे, तो मोठ्यांसोबत बोलवायचा आहे. तुझ्या रीतीने तू चांगले सांगितलेस.'' आजोबांनी हमी देत निरोप घेतला. आम्ही पुढचा प्रवास करू लागलो. मी शिवबाबांना मनापासून खूप खूप धन्यवाद देत मनाशीच पुटपुटले –


**शिव माझा ज्ञानाचा सागर,**
**दिला त्यांनी जीवना आकार।**
**शिव माझा प्रेमाचा सागर,**
**दिला त्यांनी जीवना आधार।।**

मग नंतर आमचा प्रवास पूर्ण झाला आणि आम्ही गावी पोहोचलो.

***

## विशेष सूचना

**भारत सरकार, पोस्ट खात्याने अचानक पोस्टेजसाठी आकारली जाणारी रक्कम वाढवली आहे. याकारणास्तव एका अंकाची किंमत १४/– ऐवजी १६/– करावी लागणार आहे. तसेच वार्षिक वर्गणी १००/– केली जाईल. हा बदल एप्रिल २०२६ पासून लागू केला जाईल. यापुढे नवीन आजीव सभासदत्वाची सोय नसेल. वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने अमृतकुंभ कार्यालयात पाठवावी. अन्यथा मोबाईल क्र. ९८२००२३०९२ वर संपर्क साधावा. – संपादक**



# बकुळगंध

**दिवंगत भ्राता बृजमोहनजी**

जानेवारी महिना जसा जवळ येतो तसं साकार बाबांच्या सोबत घालवलेल्या आठवणींचं भरतं मनात दाटून येतं. या आठवणी जितक्या उजाळाव्या तितक्या त्या अधिक सामर्थ्य देतात. अनेक ज्ञानमुरलीतून बाबा सांगतात, सगळ्या जीवनाचं सार आहे 'स्मृती'. विशेषकरून संगमयुगात ईश स्मृतीचेच अनन्यसाधारण महत्त्व आहे. बाकीच्या युगात स्मृती आणि विस्मृती दोन्हीचा खेळ आहे. शिवबाबांनी प्रजापिता ब्रह्माबाबांच्या द्वारे आपले ज्ञान प्रकट केले. त्यांची द्वयी इतकी अद्‌भुत होती की जणू बिंब कोणते आणि प्रतिबिंब कोणते याचा संभ्रम पडावा. मज आत्म्यास त्यांच्या सान्निध्याचा लाभ मिळाला हे फार मोठे भाग्यच होय. त्यातल्या काही मोजक्या आठवणी आज तुमच्या समोर ठेवत आहे.

**द्रष्टा जीवन :** ब्रह्माबाबा फार मोठे द्रष्टा होते. १९५३ ते १९५५च्या दरम्यानची गोष्ट आहे. मी सी.ए.चे शिक्षण घेत होतो आणि माझा धाकटा भाऊ अकरावी किंवा बारावीत शिकत होता. आमच्या आई-वडिलांसोबत आम्ही बाबांना भेटायला प्रथमच आबूला गेलो. बाबांना भेटल्यावर त्यांनी स्वाभाविकच विचारले, तू काय करतोस? मी आणि भावाने शिक्षणाविषयी सांगितले. त्यावरची बाबांची प्रतिक्रिया मला आजही मोठी मननीय वाटते. बाबांनी मला सांगितले, तू शिक्षण चालू ठेव आणि माझ्या भावाला मात्र सांगितले, शिक्षण सोड आणि ईश्वरी कार्यात झोकून दे. या सृष्टीवर मोठे परिवर्तन घडू पाहत आहे आणि अशावेळी दोन तरुणांना वेगळा सल्ला दिला. माझ्या भावाकडून संस्थेची फार मोठ्या स्वरूपाची काही कामे बाबांनी करवून घेतली. पुढे तीनेक वर्षांनी भावाने देह त्यागला तेव्हा लक्षात आले, बाबा किती कल्याणकारी आहेत. त्याचे भविष्य जाणून उर्वरित आयुष्य ईश्वरी सेवेत सफल केले. मला दीर्घायुष्य लाभणार आहे हेदेखील माहीत असल्यामुळे मला शिक्षण सुरु ठेवण्याचा आदेश दिला. आजही मी या घटनेबाबत विचार करतो तेव्हा वाटते

**देता आकार गुरूने,**
**ज्याची त्याला लाभे वाट।**
**घट पावती प्रतिष्ठा,**
**गुरु राहतो अज्ञात॥**

कुंभार मडके बनवितो त्यातील कुणी पाण्याचा माठ बनतो तर कुणी पूजेचा कलश. आपल्या सगळ्यांच्या जीवनालाही दिशा देणारे बाबाच आहेत.

**सदैव पाठीराखा :** बाबा कायम सांगत आले आहेत, मी सदैव तुमच्या सोबत आहे. माझ्या आठवणीत असाल तर माझ्या छत्रछायेचा अनुभव करत रहाल. मी सी.ए. झालो आणि नंतर स्वतःचे एक ऑफिस दिल्लीत थाटले. त्यानंतर मधुबनला बाबांना भेटायला गेलो तेव्हा बाबांच्या सल्ल्यानुसार मी नोकरी करण्याचे स्वीकारले. ऑफिसचा कारभार गुंडाळला आणि नोकरीसाठी अर्ज केला. भाकरा-नांगळ प्रकल्पासाठी भरती सुरु होती. नोकरीच्या मुलाखतीतही मी बाबांच्या आदेशाचे पालन करतोय ही गाढ स्मृती होती. जो पगार द्याल त्यानुसार मी तयार आहे या उत्तरामुळे माझी निवड झाली आणि बाकीचे उमेदवार कदाचित माझ्यापेक्षा कामात उजवे असले तरी त्यांना ती मिळाली नाही. मी शिक्षणाच्या तुलनेने कमी पगारावर रुजू झालो. मात्र इतर चार्टर्ड अकाऊंटन्ट्स येईनात म्हणून जास्त पगार देऊन जेव्हा भरती सुरु केली तेव्हा माझाही पगार आपोआपच वाढला ही आहे सद्गुरूची गुप्त कृपा. स्वतःचा व्यवसाय न करता नोकरी करायचा सल्ला देताना बाबांनी एक मोलाचे वाक्य उच्चारले होते- स्वतःच्या व्यवसायात तुझी बुद्धी फार गुंतेल. त्यापेक्षा नोकरी कर. राजयोग

(पृष्ठ क्र. १२ वर)



# गुलजार दादीजींसोबत ज्ञानचर्चा

**संकलक : ब्र.कु. अश्विनी, मंडणगड**

**जयंती दीदी :** दादी ओम् शांती. आम्ही लोकांनी जी गोष्ट ऐकली आहे, त्यात असे म्हणतात की, ''बाबांना सुरुवातीला जेव्हा साक्षात्कार होऊ लागले, तेव्हा त्यांना असाही एक साक्षात्कार झाला, ज्यात त्यांना दिसले, 'वरून, आकाशातून तारे येत आहेत. ते जेव्हा पृथ्वीच्या जवळ येतात, तेव्हा ते सर्व दैवी स्वरुप धारण करूनच सृष्टिवर अवतरित होत आहेत. त्यावेळी आम्ही लोकांनी बाबांच्या ज्या गोष्टी ऐकल्यात, की बाबांना हे फार सुंदर दृश्य दिसायचे. देवतांचे आपसात एवढे सुंदर नाते, वागणे, बोलणे – जसे काही तोंडाने ते शब्द बोलत नाहीत पण जणु काही गीतच गात आहेत. संगीत चालू आहे, ते चालतात तेव्हा त्यांची चाल देखील रास लीला करावी ह्या पद्धतीची आहे. आम्ही ह्या गोष्टी फक्त ऐकल्यात. पण तुम्ही ही तर ह्या सर्वांचा साक्षात्कार केला आहे. म्हणूनच तुम्हाला हा प्रश्न विचारतोय की – आम्हाला सांगा देवतांचे संवाद कशाप्रकारचे असते?

**दादी गुलजार :** ओम् शांती. तुम्ही सर्वजण अनेक वेळा आपल्या स्वर्गीय जगतात राहिलेले आहात, राज्य केले आहे आणि आता संगमयुगी रुपात बसलेले आहात. तुम्हीही आठवा जरा की आम्हीच कल्प कल्प सत्ययुगी दुनियेत राज्य अधिकारी बनून राहिलो आहोत. आठवले ना ! बघा – सर्वच जण राज्य अधिकारी होते. म्हणूनच सर्वजण अनुभवी आहात. ज्यांनी राज्य केले आहे ते अनुभवी तर असणारच. तरीही आता जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर देते. तिथे काय आहे सांगू का! खूप खूप आनंद आहे. दुःखाचे नावही नाही. त्या आनंदाची छटा चालताना, बसताना, उठताना, एकमेकांना भेटताना – आपसूकच बघायला मिळते. जी सहज असते ना ती गोष्ट फार सुंदर असते. नकली गोष्टीत ती छटा दिसणार नाही. देवतांचे आयुष्यच आनंदी आहे. आनंद तर आहेच पण सर्व प्राप्ति–स्वरूपही आहे. त्या सर्व प्राप्तींची चेहऱ्यावर येणारी लाली केवळ अवर्णनीय! ते जीवनात प्रकटरुपात आहे. आपल्याला वाटते असे असावे तसेच ते त्याहीपेक्षा सुंदर असते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून आपल्याला त्यांच्या संपन्न जीवनाची चुणुक दिसते. एक असते काही मनासारखी गोष्टी झाली म्हणून आनंद ते झाले तात्पुरते. तिथे नैसर्गिक आनंद असतो. जीवनच आनंदी असल्याने त्यांचे वागणे–बोलणे आगळेच असते. विचार करा असे जीवन जगणारे देवता कोण होते? तुम्हीच ना! तुमचेच असे संपन्न जीवन होते. आणि प्रत्येक ५००० वर्षानंतर तुमचे असे आयुष्य बनणारच हे नक्की. आत्ताही बनत आहे. सत्ययुगात खुशी, आरोग्य, सर्व प्राप्ती सम्पन्नतेचे रुप आपलेच असणार आहे. ते प्रत्येक देवतेचे असणारच.

**जयंती दीदी :** दादी राज्य कारभाराची गरजच नसेल का तिथे?

**दादी :** कारभार तर असणारच ना! मुले शिकायला जातील शाळेत पण तिथे शिक्षण खेळीमेळीच्या वातावरणात शिक्षण असेल.

**जयंती दीदी :** राज्य कारभार! राज्य चालण्याचा कारभार?

**दादी :** तेही खूप प्रेमाने. कारण तिथे भांडण तंटा तू तू मैं मैं नसणारच ना! म्हणून जास्त विचारही चालणार नाहीत. काय करावे, कसे करावे – असे प्रश्न निर्माण होणार नाहीत. सर्व प्राप्ती सम्पन्न असल्याने, सगळी प्रजा, सगळे सामान्य लोक यांचेही तरंग सकारात्मक शुभच असतील. नैसर्गिकरित्या जीवनच असे असेल की, विचार करायची गरज नसणार.

**जयंती दीदी :** ज्यावेळी देवता एकमेकांना बघतात, तेव्हा त्यांच्या दृष्टीमध्ये काय भावना असते?

**दादी :** एकमेकांना आपण कोणत्या नात्यात आहोत, त्या नात्याच्या दृष्टीने बघतात तसेच एकमेकांना बघत असताना शांती–सुखाचे तरंग, आनंद

प्रेमाचे तरंग निघतात. सर्वांचेच विचार सकारात्मक असल्याने वातावरणातही तसेच शांती, सुख, प्रेम, आनंदाचे तरंग पसरतात.

**जयंती दीदी** : म्हणजे जास्त करून शांतीपूर्ण संवाद किंवा देव-घेव होते का?

**दादी** : नाही, फक्त शांतीचे नाही, तर जे कार्य करायचे असेल, त्या प्रमाणे कर्म त्याचे वायुमण्डळ तयार होते. समजा शाळेत गेले. तर शांततेत काय जाणार, ते त्यांच्या रीतीप्रमाणे नाच-गाणे करत आनंदाने खेळत जातील. जशी वेळ, जसे कर्म तसे तसे त्यांचे वागणे असेल. पण तिथे आनंद एकदम नैसर्गिक पद्धतीचा असेल. चेहऱ्यावर तो आनंद आणावा लागेल, असे नाही. ओढून ताणून नव्हे.

**जयंती दीदी** : म्हणजे बाबा जे म्हणतात की, एक नैसर्गिक आत्मिक स्थिती असेल, त्याचा अनुभव, सत्ययुगातला काही वेगळाच असेल न ! संगमयुगात जे आपल्याला विचार करावा लागतो, आठवण ठेवावी लागते, आत्मिक स्मृतीला पक्के करावे लागते, मग देवतांची तिथे जी आत्मिक स्मृती असेल ती कशाप्रकारची असेल?

**दादी** : तिथे नैसर्गिक रुप असेल, इथे विचार करावा लागतो. आता आपल्याला आनंदी राहायचे आहे - असा विचार करत नाहीत. ते त्यांच्या स्वभावातच असते. मी स्वभावतःच आनंदी आहे. मग अशा व्यक्तीला ओढून-ताणून खुश व्हायचे कारणच काय!

**जयंती दीदी** : असं म्हणू शकतो का सर्वजण पवित्र आहेत. शुद्ध, श्रेष्ठ, आहेत. पण मला एक सांगा, की संस्कारांचे वैविध्य असेल का?

**दादी** : हो, राजा आणि प्रजेमध्ये फरक तर असेलच पण प्रजा पण खुशच असते न! सर्वांमध्ये सर्व प्राप्तीची ती तृप्ती असतेच. म्हणूनच सर्वांच्या आनंदी राहण्यात फरक दिसणार नाही.

**जयंती दीदी** : म्हणजे संस्कार एकसमान असतील की फरक असेल? राजेपणाचे संस्कार असतील. पण प्रजेमध्ये राजाचे संस्कार नसणारच न! पण सर्वांमध्ये आनंदाचे संस्कार मात्र सामायिक आणि स्वभावतःच असतील. समजा श्रीलक्ष्मी आहे. श्रीनारायण आहे - त्या दोघांच्या वागण्या-बोलण्यात काय फरक असेल?

**दादी** : त्यात फार फरक नसेल. आनंद, ऐट दोघांमध्येही तेवढाच असेल. कारण दोघेही संगमयुगी पुरुषार्थाचे प्रारब्ध भोगत आहेत. म्हणून तिथे त्यांना कोणताच पुरुषार्थ करावा लागत नाही सर्व नैसर्गिक आहे.

**दीदी** : स्त्री-पुरुषाचा ही फरक नसतो का?

**दादी** : स्त्री-पुरुषाचे ज्ञान असेल, पण भान नसणार. तशी त्यांची वृत्ती दृष्टी नसेलच!

**जयंती दीदी** : दादी मी थोडा विषय बदलते. देवतांचे जे संवाद होतात त्याबद्दल तुम्ही आताच सांगितले आहे. पण तुम्ही जे सुक्ष्मलोकीचा अनुभव घेता, तिथे कशाप्रकारचा संवाद असतो? तुम्ही जे सांगता खूप भरभरून वर्णन करता, बाबांनी असे हे सांगितले- ह्या बाबांच्या गोष्टी तुम्ही कशाप्रकारे समजता?

**दादी** : नाही ग, ते सर्व मला स्पष्ट दिसते न! मी जेव्हा सूक्ष्मलोकात ध्यानावस्थेत जाते न, तेव्हा जसे इथे सर्व काही बघतो. तसेच तिथे बाबा दिसतात ते दुरून दिसतात. इथे कसे कुणी दुरून दिसते. मग जवळ येतात, तसेच तिथेही अनुभवास येते.

**जयंती दीदी** : पण बाबांना तुम्हाला जो संदेश द्यायचा असतो, जो तुम्ही आम्हाला येऊन सांगता, तुम्हाला कसे कळते?

**दादी** : नाही, नाही, बाबा बोलतात, समजावतात. बच्ची आओ. समजा- मी एखादा संदेश आणलाय - तो ऐकून एखादा त्यावर कसे उत्तर देईल, मला तसा अनुभव होतो - बाबा सगळं मला सांगत आहेत असा अनुभव होतो.

**जयंती दीदी** : आम्ही हे ऐकलेले आहे, की सूक्ष्मलोकात सगळे हावभावाच्या रुपात घडते.

**दादी** : हो, आम्ही जो संदेश घेऊन जातो - आम्हीही जणू मूक चित्रपट होऊन जातो. त्यामुळे बाबांची आणि आमची भाषा एक झाल्याने आम्हाला ते नैसर्गिक वाटते.

**जयंती दीदी** : म्हणजे तुम्हाला असेच वाटते का, इथे आवाजात बोलतो, तसे आवाजात बाबा सांगतात, त्यामुळे तुम्हाला ते कळते?

**दादी** : हो, बाबा जे सांगतात, ते सर्व समजते जसे काही कुणी समोरून स्पष्टपणे बोलत आहे. म्हणजे मला ते इतकं सहज समजते न त्यात अवघड काहीच वाटत नाही की, 'हे काय म्हटलय बाबांनी' असे कधीच वाटत नाही. म्हणजे बाबांच्या बोलण्यात स्पष्टता जाणवते, कोणताच गोंधळ नसतो. बाबांबरोबरचा संवाद एकदम स्वाभाविक असतो.

**जयंती दीदी** : म्हणजे असे म्हणावे की बुद्धिची तार खूप स्पष्ट जोडलेली

असते. एवढे तुमचे आणि बाबांचे संवाद होतात की बाबांचे जे संकल्प चालतात, ते तुम्हाला सहजच कळतात?

**दादी :** नाही, मी पण बदलते ना तिथे गेल्यावर-मी पण जणू काही बाबांसारखीच सूक्ष्म कायाधारी बनते, म्हणून सर्व काही नैसर्गिक वाटते. अमृत वेळेला तुम्हीही तसा अभ्यास करा.

**जयंती दीदी : बाबा सर्वांना तसा अनुभव करवतील?**

**दादी :** हो यथाशक्ती जो तो अनुभवेल. जेवढी-जेवढी ज्याची त्याची शक्तिशाली, अशरीरीपणाची अवस्था असेल, तेवढेच ते अनुभव करू शकतील.

**जयंती दीदी :** दादी, आता संगमयुगातील दुसरी गोष्ट विचारते - आता तर आपल्याला देवता बनायचे असेल, तर आम्ही कशाप्रकारे आपला पुरुषार्थ करावा?

**दादी :** मला वाटते देवता बनण्यासाठी आपले आताचे जे स्वरूप आहे, ब्राह्मण स्वरूप हे देवतांपेक्षाही उच्च दर्जाचे आहे. आता ह्यावेळी परमात्मा थेट आपल्याला भेटतोय; आपल्याशी संवाद साधतोय... तिथे स्वर्गात 'तो' असेल का? नसेलच ना! सर्व कल्पात जर श्रेष्ठ जन्म कोणता आहे हे जर आपण बधितले, तर तो आहे हा ब्राह्मण जन्म.

**जयंती दीदी :** मग आज आम्हा ब्राह्मणांचा आपसात कशा प्रकारचा संवाद असावा दादी?

**दादी :** संवाद असा असावा - आपण एखाद्याला भेटताना जरी संगमयुगातील ब्राह्मण रुपात असलो, तरी ब्राह्मण देवदूत आहेत, त्यानंतर तेच देवता बनणार आहेत. हे ज्ञान बुद्धित असावे. मी कुणाला भेटत आहे? हा कोण आहे? समोरचा आत्मा आता सध्या कोणत्या रुपात आहे, भविष्यात तो कोण बनणार आहे. हे बुद्धित आपसूकच यावे. त्या दृष्टिकोनातून एकमेकांना भेटावे. साधारण शारीरिक नावासकट ही अमकी-तमकी आहे. असे म्हणाल तर त्या व्यक्तीचे संस्कारही समोर येतात ही अशीच आहे. तो तसाच आहे. पण त्याच ब्राह्मणाला तुम्ही देवदूत रुपात बघाल, तर ह्या गोष्टी गौण वाटतील, दिसणारच नाहीत.

**जयंती दीदी :** आता अंतिम घंटा वाजायला थोडाच वेळ आहे, जेव्हा ईश्वरी मिलनाचा ध्यास घ्यायचा आहे तेव्हा कोणती विशेष गोष्ट लक्षात ठेवावी? किंवा काय अभ्यास करावा?

**दादी :** शिवबाबा अशरीरी आहेत. अशाप्रकारे प्रत्येकालाच अशरीरी अवस्थेचा सखोल अभ्यास आवश्यक आहे.

**जयंती दीदी :** हो दादी. तुम्ही आम्हाला अजून काही विशेष सांगाल का?

**दादी :** मला असे वाटते पूर्ण कल्पात जर कोणते जीवन श्रेष्ठ असेल, तर ते आताचे संगमयुगी जीवन आहे. मग भले सत्ययुगात आपण देवता बनू, राजा-राणी बनू, पण ह्या वेळेच्या ब्राह्मण जीवनाचे जे महत्त्व आहे, ते सर्वश्रेष्ठ आहे. कारण आता आत्म्याला परमात्म्याचे पूर्ण ज्ञान आहे. आपण परमात्म्याला भेटतोय. परमात्मा आपल्याला ज्ञान ऐकवतोय. म्हणूनच आता परमात्मा आणि आत्म्याचे नाते आहे. स्वर्गात तर देव-देवतांचे त्यांच्या पदानुसार राजा-राणी-प्रजा-असे नाते असेल पण ह्या संगमयुगात आपल्याला जे परमात्म रुप बघावयास मिळतेय, आपण मिलन मेळा करतोय, 'त्या' च्या शी बोलू शकतो, सर्व संबंधांचा रस प्राप्त करू शकतो, ते सत्य युगात ही मिळणार नाही बरं का! केवळ ह्या संगमयुगातच आपण परमात्म्याला त्याच्या सत्य ज्ञानासकट भेटतो. ह्यावेळी ही श्रेष्ठ स्मृती आहे की परमात्मा आम्हा आत्म्यांशी संवाद साधतोय तोही थेट. हे सर्व पूर्ण कल्पात कधीच मिळणार नाही. म्हणूनच संगमयुग सर्वश्रेष्ठ युग आहे. संगमयुगाचा १-१ सेकंद वर्षांप्रमाणे आहे. आपण ते फारच साधारण समजतो. पण लक्षात ठेवा १ सेकंद वाया नाही गेला, तर पूर्ण १ वर्ष वाया गेले एवढे संगमयुगाचे महत्त्व आहे. परमात्म्याला त्याच्या खऱ्या रुपात थेट भेटणे - हे कोणत्याच युगात शक्य नाही. सत्ययुगात देवता रुपात असू. पण आता आपल्याला हेही कळतंय की आपल्याला परमात्मा भेटला आहे, परमात्मा त्याचे सत्य ज्ञान देतोय, परमात्म्याचा सत्य परिचय, सर्व संबंधांचे सुख घ्यायची हीच वेळ आहे. पूर्ण कल्पात 'तो' कधीच भेटणार नाही.

**जयंती दीदी :** धन्यवाद दादी. तुम्ही खूप छान-छान गोष्टी सांगितल्यात, तसेच आपल्याला कोणत्या प्रकारच्या गोष्टी लक्षात ठेवायच्या आहेत, हे ही छान सांगितले, विशेष आम्ही आपली स्थिती कशाप्रकारे बनवावी हे ही सांगितले.

**दादी :** आता संगमयुगाचा आपण जास्तीत जास्त फायदा घ्यावा. कारण संगमयुग फार छोटे युग आहे. ह्यात परमात्मा त्याच्या सत्य रुपात

(पृष्ठ क्र. १२ वर)



# सुरक्षा कवच

ब्र.कु. जमिला, बी.के. कॉलनी, आबू रोड

समजा मला १००० प्रकारचे पराठे करायला जमत असेल, पण मी त्यासाठी स्वयंपाक घरातच जात नाहीये, तर मला सांगा अशा परिस्थितीत मी पराठे कसे करू शकेन? आपल्या सर्वांचे काहीसे असेच झाले आहे.... सचिनभाईंचा क्लास, राजूभाईंचा क्लास, उषादीदींचा क्लास, जयंतीदीदींचा क्लास, ह्याचा क्लास, त्याचा क्लास, मुरलीची श्रवण भक्ती, बाबांनी ही महावाक्ये किती छान सांगितलीत ना!.... पण त्यातील गोष्टींचा सराव मात्र नाही... ते पराठ्यांसारखं होतंय. मी स्वयंपाकघरातच जात नाही... पराठे तयार होतील का? त्यातील ज्ञानबिंदू फक्त ऐकून, दुसऱ्याला ऐकवून धारण होणार नाहीत. सरावानेच ते जमू शकेल.

झोपेतून उठताच पाय जमिनीवर ठेवण्याआधी एक प्रकारचे कवच घालणे फार आवश्यक आहे. बघा मी माझ्या आईची एकुलती एक मुलगी आहे. मला ५ सख्खे भाऊ आहेत. माझी आई आपल्या आजारपणात ३० वर्षे अंथरुणाला खिळून होती. तिला संधीवात झाला होता. सर्व हाडे, हातापायाची बोटे वाकडी झाली होती. मी जेव्हा ज्ञानात आले, तेव्हा माहेरच्या घरी तर मांसाहार करायचे त्यामुळे मला माहेरी जायला फार अडचण यायची. त्याचा वासही मला सहन व्हायचा नाही. त्यामुळे माझे माहेरी जाणे कमी झाले. पण आईला मात्र मीच हवी असायची बाकी कोणी नको. आई रात्री जोरजोरात ओरडायची, जमिलाला बोलवा, जमिलाला बोलवा.... त्यामुळे माझे भाऊ मला फोन करायचे, 'तुला आईची काळजी नाहीये का? तू इथे येऊन राहू शकत नाहीस का तिच्यासाठी? आई-वडिलांची सेवा करणे आपले कर्तव्य आहे हे मला माहिती आहे हो - पण हे कोणत्या वेळी, ज्यावेळी त्यांची काळजी घेणारे कुणीच नसेल तेव्हा.

मला काय करावे सुचेना - मग मी सरळ बाबांच्या रूममध्ये गेले. म्हटले, ''बाबा माझी लौकिक आई आजारी आहे. तिला तुलाच सांभाळावे लागेल आता. ती पण तुझीच मुलगी आहे ना! मला काही माहीत नाही - ती मला का बोलावते आहे? सांग बरं! हा मोह नाही तर काय! सांग मी काय करू? आता बघा आईजवळ तिचा पती आहे, काळजी घेणारा, १०-१० नोकर आहेत सेवेत. ५ मुलं, ५ सुना आणि नातवंडाची तर मोजदादही नाही. कारण सगळे चुलत मिळून १९ भाऊ, त्यांच्या बायका, मुलं. मग ती मलाच का बोलवतेय? मी एकाचे कल्याण करू की विश्वाचे?''

तेव्हा बाबांनी मला हे कवच कसे धारण करावे ते शिकवले - 'मुली, हे कवच धारण करशील, तर तिलाही सोपे जाईल, तूही सुटशील! मला सांगा कवचामुळे काय फायदा होतो? मी आईची आठवण करत नाही, पण ती मात्र मला बोलवतेय - अशा परिस्थितीत माझी मानसिक अवस्था वर खाली होईल. पण मी जर बाबांनी सांगितलेले कवच धारण केले तर तिच्याकडून येणारी मोहाची परीक्षा त्या कवचासमोर निष्प्रभ होईल आणि दोघीही शांत राहू. बाबा आईला आणि मलाही शांत ठेवतील जर सुरक्षा कवच असलेले असेल तर! असे मोहाचे क्षण प्रत्येकाच्याच जीवनात येतच असतात.

कवच कसे धारण करावे - अमृत वेळेला बापदादांचे आपल्या घरी, मनोभावे आवाहन करा. आपल्यासमोर बोलवा. बाबांचा वरदानी हात माझ्या डोक्यावर आहे. त्यांच्या हात आणि डोळ्यांतून शक्ती निघून माझ्यात सामावत आहेत. आता ह्या शक्तींचे कवच माझ्या संपूर्ण शरीराभोवती निर्माण झाले आहे. असा संकल्प करा. ह्या कवचामुळे बाहेरून येणाऱ्या आसुरी शक्तींचा माझ्यावर परिणाम होत नाही. मला सुरक्षित वाटत आहे हा

(पृष्ठ क्र. १६ वर)



# जीवन एक प्रभूप्रसाद

ब्र.कु. जीवन, हिंगणघाट

आपल्या आयुष्याची सारी वाट बदलून टाकणाऱ्या बाबांचे मनात स्मरण करताच नवशक्तिंची उर्जा भरली जाते. अशक्यप्राय संकल्पांना यशाची माळ घालून भविष्याचे सारे रुप बदलणाऱ्या एक नाही तर अनेक गोष्टींचा 'प्रभू – प्रसाद' (सौगात) देऊन बाबांनी माझ्या जीवनाला कृतार्थ केले आहे. त्यासाठी 'बाबा' आपले कोटी कोटी 'धन्यवाद' करायला मजजवळ शब्दांची संख्याही अपुरी पडते आहेत.

या सर्व घटनांमधील सर्व श्रेष्ठ २९ जून २००७ चा तो पावन दिवस! ज्यावेळी पहिल्यांदाच बाबांच्या घरी (सेंटरला) जाण्याचा शुभ योग आला, त्यासाठी निमित्त बनले माझे काका – आनंदराव, त्यांच्यामुळे शिवबाबांचा परिचय मिळाला आणि मी बाबांचा झालो. हे सर्व कसे घडत गेले हे सुद्धा त्यावेळी कळले नाही. यासाठी काकांचे आभार.... कारण त्यांच्या माझावरील स्नेहांमुळेच या जीवनात सुख, शांति, शक्ति, आणि आनंदाची भरती आली.

बाबांसोबतच्या पहिल्या भेटीनंतर बी. के. राजुभाईनी या ज्ञानावरील सप्तदिवशीय कोर्स केल्यानंतर नवव्या दिवशी सकाळी मुरली ऐकत असताना मनाने बाबांना एक प्रश्न केला...'बाबा, खरंच तुम्ही शिव बाबा असाल, तर ब्रह्मा बाबांच्या माध्यमाने आज माझ्या कपाळी आत्मस्मृतीचा टिळा लावला तरच उद्याला तुमची मुरली ऐकायला नक्की परत येईल, नाही तर तुमची आणि माझी कट्टी...'

हा आजचा माझा प्रश्न भक्तिमार्गातील धारणेचा भाग होता. कारण त्यावेळी ज्ञानाचे रहस्य मला पूर्णपणे उमजले नव्हते. मुरली ऐकत असतांना बाबांच्या चित्रांकडे बघून मनाने बाबांशी संवाद सुरुच होता... बाबांनी आज मला भेट द्यावीच हीच मनाची आर्त भावना होती. काही वेळानंतर एक अविस्मरणीय आणि विलोभणीय दृश्य बाबांनी दाखविले... साक्षात ब्रह्माबाबांना आपल्या वास्तविक रुपात स्टेजवरुन हळूहळू येऊन माझ्या कपाळी टिळा देऊन... 'बच्चे, अमर भव' शब्दांचे उच्चार कानांत पडताच डोळयातून आनंदाश्रूंच्या धारांना वाट मोकळी केली. 'बाबा आले आणि परत निघून स्टेजवरील चित्रात अदृश्य झाले. या पहिल्याच अद्भुत साक्षात्काराने बाबांवरील माझा विश्वास दृढ होतांना मन मला सांगत होते 'बाबा माझ्यासाठीच आलेत'. आज एवढी वर्षे लोटली तरी हा 'प्रसंग' जणू कालच घडला असे नेहमी वाटत आहे.

त्या दिवसापासून 'बाबा', या जीवनाचा एवढा पक्का भाग झाला जो आज सतरा वर्षे होऊनही मुरली कधी चुकू दिली नाही. बाबांच्या ज्ञान व योगाने जीवनाची सारी दिशा आणि दशा पार बदलली. हे लिहितांना खरेच समाधानही वाटते कारण संपूर्ण परिवाराने बाबांचा हात हाती घेऊन, ज्ञानांची कांस धरून दैनंदिन जीवनात सुख शांति, आनंद, शिस्त आणि पवित्रतेचा खळखळणारा प्रवाह– निर्माण करून स्वत:च्या वागण्यात देवत्वाची लक्षणे निर्माण केलीत, यासाठी बाबा, आपले धन्यवाद....!

सकाळी अमृतवेला, सेंटरवर मुरली, दिवसभर ४–५ वेळा मुरलीचे पठण, सायंकाळी योग यामुळे उर्वरित आयुष्याला बाबांनी एक शिस्तीची दिनचर्या लावली. कर्मयोगी बनून, साक्षीदृष्टा राहून वैश्विक नाटकातील सर्व कर्म करून कर्मबंधनांच्या अवघड खात्यातून आपली मुक्तता होत असल्याचे आंतरिक समाधान वाटते. बाबांच्या चिंतनाने 'मन चलो निजनिकेतन...' चा नाद मनाने करण्यात आनंद वाटतो, यातच भविष्याची गति–सद्गति लपली आहे.

सेंटरवरील आदरणीय दीदींचे मातृतुल्य संगोपन आणि राजूभाईंच्या सखोल ज्ञान प्रबोधनामुळे नव जीवन जगण्याची प्रेरणा ८० व्या वर्षाच्या उंबरठ्यावर मिळत आहे हे खरेच माझे

भाग्य समजतो, कारण बाबांनी विकाराच्या कचऱ्यातून काढून आपल्या पावन कुशीत घेऊन हे जीवन धन्य केले. बाबा हा कल्याणकारी ड्रामा आमच्या सर्वांसाठी घडवून आणून नवउत्साहांनी जगण्यासाठी प्रशस्त ज्ञान-मार्ग बनवून दिला हीच खरी गोल्डन गिफ्ट परत पाच हजार वर्षानंतर पुन: दिली आहे यासाठी कोणत्या शब्दांनी 'बाबा' आपले आभार मानावे......!

ज्ञान, योग, धारणा आणि सेवा या चतु:सूत्रीने विश्व रंगमंचावरील रहस्ये उमलल्यानंतर घरी परत जाण्याची ओढ या वयात येणे स्वाभाविकच असते, परंतु कुटुंबातील ज्यांचे - ज्यांचे पूर्व जन्मांचे आणि या जन्माचे कार्मिक ओझे जोपर्यंत पूर्ण होणार नाही तो पर्यंत या आत्म्याला मुक्ती नाही, हे ही सत्य. जेव्हा त्या मंगलमय पावन क्षणाचं आगमन होईल त्यावेळी माझे मन निरंतर बाबांच्या स्मृतित रहावे. मुरलीचे वाचन सुरू असताना, बाबा, तुझा हात माझे हाती असताना, कोणत्याही भौतिक उपचारांपासून दूर ठेवून पुढल्या प्रवासाची दिशा ठरवावी............हीच एक अंर्तमनाची आर्त विनवणी..... एकच इच्छा........!

***

---

(पृष्ठ क्र. ३ वरून)

त्यादरम्यान असेल तर आवर्जून त्यांच्याकडून राखी बांधून घेत. अशाप्रकारे त्यांच्याशी एक जवळचे नाते प्रस्थापित करण्याची संधी ते सोडत नसत.

एळाद्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी शुभ इच्छा असावी पण त्यासाठी जीवाचा आटापिटा करू नये असे त्यांचे प्रांजळ मत असे. आपल्या स्वभाव-संस्काराचे परिवर्तन करण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करावे मात्र भौतिक वस्तूंसाठी आपली शक्ती किती खर्च करायची याचे गणित नक्की असावे. **'जीवनं सर्वदा भवतः इष्टं न ददाति'** हा मंत्र ते विसरत नसत.

**'जातस्य हि ध्रुवो'** या न्यायानुसार भ्राताजी पुढील जन्माकरिता निघून गेले मात्र अनेक आठवणींच्या रूपात बरंच काही शिकवून गेले. असा उमदा माणूस लाभणे हेही एक भाग्यच म्हणावे लागेल.

***

---

(पृष्ठ क्र. ६ वरून)

साधनेत बुद्धीचाही वापर आहे त्यामुळे बुद्धीची शक्ती वाया जाऊ न देणे हा उद्देश माझ्या मनांत ठसला.

बाबांचे आणखी एक महावाक्य माझ्या मनांत घर करून आहे. जीवनात विशाल हृदय ठेवा, शुद्ध हृदय ठेवा आणि प्रत्येक कार्य शिवबाबांचे आहे असे समजून करा मग कामात साफल्य आहेच. मी याचा प्रत्यय वारंवार घेतला आहे. अशीच एक हृद्य आठवण सांगतो- साकारबाबांना कुणीतरी एक छानशी कागदपत्र ठेवायची बॅग दिली होती. मी आबूला गेलो असताना बाबांनी ती मला दिली आणि म्हणाले ईश्वरी सेवेकरिता वापर. तेव्हापासून आजपर्यंत मी तीच बॅग वापरत आहे. माझी भावना आहे किंवा तसा अनुभवही आहे की ईश्वरी सेवेत मला मिळालेल्या यशात त्या बॅगेचाही मोठा सहभाग आहे. तिच्यामुळे बाबांची आठवण सेवेत राहतेच असा माझा अनुभव आहे. अशा अनेक आठवणी साकार बाबांविषयीच्या आहेत.

शांताबाईंच्या 'आठवण' नावाच्या कवितेत फार छान उल्लेख येतात. आठवणी बंद हृदयाच्या कप्प्यात असतात, वसंतातल्या गुलमोहरात असतात वगैरे. त्यातल्या शेवटच्या दोन ओळींनी समारोप करूयात.

**'या साऱ्यांभोवती फिरत असतो श्वास आपला मंद धुंद**
**आणि यातूनच मग दरवळतो तो आठवणींचा बकुळगंध.'**

**(भावानुवाद – ब्र.कु.नितीन, मस्कत)**

***

---

(पृष्ठ क्र. ९ वरून)

आपल्याला भेटतो. आपण त्याला ओळखून म्हणतो परमात्मा आम्हा आत्म्यांना भेटतो. हे इतर युगात शक्य नाही. संगमयुगाचा १-१ क्षण महान आहे. परमात्मा आपल्याशी थेट बोलतोय असे भाग्य कोणत्याही युगात लाभणारे नाही.

**जयंती दीदी :** धन्यवाद दादी.

***



# शांतीवन निर्मितीत सिंहाचा वाटा - भूपाल भाईजी!

**ब्र.कु. हेमंत, शांतिवन**

शांतीसागर शिव शांतीचा संसार रचण्यासाठी ब्रह्मातनात अवतरले. सन १९३६ मधे सिंध प्रांतात शिव-सागरातून उगम पावलेली शांती-सरिता सन् १९५० नंतर आबू शिखरावरून वाहू लागली. शांतीचे अमृतपान करण्यास चातक मंडळी आबूला येऊ लागली. ओममंडळी पासून आरंभलेला शेकडो ब्रह्मावत्सांचा ताफा ओमशांति भवन पर्यंतच्या प्रवासात हजारोंमधे बदलला होता. आता आवश्यकता होती लाखो आत्म्यांच्या प्रभू मिलनासाठी एका विशाल परिसराची! हे महान लक्ष्य ठेवून शांतिवनची निर्मिती झाली आणि ह्या श्रेष्ठ कार्यासाठी निमित्त बनले, राजयोगी भ्राता भूपाल भाईजी! शांतिवन हे पावन तीर्थ साकार करण्यात भूपाल भाईंनी दधिची ऋषी समान आपले सर्वस्व स्वाहा केले. भूपाल भाईंच्याच भगीरथ प्रयत्नांमुळेच शांतिवन, मनमोहिनी वन, आनंद सरोवर, मानसरोवर व बघेरी इत्यादी स्थानांच्या जमिनी घेऊन त्यावर भव्य भवने बनली.

भ्राताजींचा जन्म ९ ऑगस्ट १९४६ ह्या शुभदिनी उत्तर प्रदेशच्या मेरठ शहरात झाला. पिता 'शिंगरुसिंह' आणि माता 'बलदेवी' यांनी सुंदरसं नाव ठेवले 'भूपाल!' 'जैसा नाम वैसा काम' ह्या हिंदीतल्या म्हणीप्रमाणे भ्राताजी शांतीवनच्या भूमीचे पालनहार बनले. आपल्या पहिल्याच भेटीत पिताश्री ब्रह्माबाबा भाईंना वरदान देत म्हणाले, 'बच्चे, आप तो शेर (सिंह) बहादूर हो' भाईंनी भारतीय सेनेत सेवा दिली. सन १९६५ मधे भाईजी तरुण असतानाच ब्रह्माकुमारी संस्थेच्या संपर्कात आले. ज्ञान प्राप्त होताच मेरठ सेवाकेंद्रात मोठ्या उत्साहाने सेवा करू लागले. सन १९७० भाईजी मधुबनमधे समर्पित झाले. भाईजी मनमोहिनी दीदींच्या प्रेरणेने बांधकाम व खरेदीच्या कार्यात चंद्रहास दादांचे तसेच ब्रह्माभोजनासाठी आवश्यक भाजीपाला खरेदीत भूरीदादींचे मदतगार बनले. आबूरोड येथे संगमभवन बनल्यावर आनंदकिशोर दादांच्या सल्ल्याने भाईजी संगमभवनमधे निवास करू लागले. ७० च्या दशकात मधुबन मुख्यालयात वाहतुकीसाठी कार, ट्रक, एम्बुलन्स चालवणारे भूपाल भाईजी एकमात्र चालक होते.

भूपाल भाईजी ज्ञानमार्गात आपल्या पदार्पणाची कथा सांगताना म्हणायचे, ''बालपणापासूनच मला देश तसेच समाजसेवेचे खूपच वेड होते. मला कित्येकदा ब्रह्माकुमारी संघटनेचा साक्षात्कार झाला होता. बालपणी स्वतःला एका अलौकिक श्वेतवस्त्रधारी भाऊ बहिणींच्या समूहात एका दिव्य पुरुषासोबत (नंतर कळलं ते ब्रह्माबाबा होते.) फिरताना करताना पाहायचो. ते भाऊ-बहिणी खूप तपस्वी आणि शांतीचे अवतार भासत! हे सुंदर दृश्य पुन्हा-पुन्हा माझ्या डोळ्यासमोर येई तेव्हा मला वाटे की हे सत्य आहे की स्वप्न? त्या कालावधीत माझे मन अशांत असायचे, मी काहीसा तणावात, चिंतातुर असायचो. जेव्हा ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रात पोहचलो तेव्हा मला कळले मी कोण आहे? माझ्या जीवनाचे नेमके लक्ष्य काय आहे? मला जे हवयं ते का प्राप्त होत नाही? आधी मी स्वतःला शरीर समजत होतो देहच मानत होतो बाबांचे दिव्य ज्ञान मिळताच मला स्वतःचे सत्य स्वरुप दिसले. ह्या शरीराला चालविणारा मी एक ज्योतिबिंदू चैतन्य आत्मा आहे. आत्मा आणि शरीरातील अंतर समजताच देहभान लोप पावले, आत्मशांती लाभली. आता ताण-तणावापासून मुक्त झाल्याने, जीवन आनंदाने बहरून गेले.

मला समजले की शिवबाबा साकार शरीराद्वारे ज्ञान प्रकट करतात, तेव्हा माझ्या मनातली उत्कंठा जागी झाली की निराकार शिवाचे ब्रह्माबाबांच्या देहात कसे बरे अवतरण होत असेल? मी बाबांना भेटायला

फारच उत्सुक होतो. ईश मिलनाची ओढ तीव्र होत होती. अखेर ती मंगल घटिका आली. १९६७ साली मी साकार बाबांना भेटायला मधुबन म्हणजेच मा. आबू येथे पोहचलो. रस्ताभर मनात अनेक चित्रे उभी राहत होती. कशी असेल ती दिव्य मूर्ती, ज्यांच्या देहाचा आधार साक्षात भगवंताने घेतला आहे? कसं होईल त्या महान विभूती बरोबरच मिलन? कशी असेल ती अनुभूती?

मधुबनच्या प्रांगणात पाऊल पडताच माझे डोळे त्या पुण्य पुरुषाला पाहायला उतावीळ झाले होते. मी सायंकाळी पोहचलो अन् दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता मला पिताश्री ब्रह्माबाबांचे दर्शन झाले, जेव्हा ते मुरली क्लासमध्ये चालत आले. त्या दिव्य पुरुषाला पाहता क्षणीच माझे तन-मन प्रफुलित झालं. मन-मंदिरात एकच मंगलध्वनी गुंजला, 'पाना था सो पा लिया..(मज आत्म्याला जे हवे होते ते मिळाले) बाबा आसनस्थ झाले. मी बाबांची मधुर (ज्ञान) मुरली ऐकत होतो. ते माझे पहिलेच परमात्म मिलन होते. ते ही ब्रह्माच्या साकार माध्यमाद्वारे...! किती सुखद अतीइंद्रिय सुखाचा तो दिव्य अनुभव होता! त्या अलौकिक आनंदाचे वर्णन मी शब्दात करू शकत नाही.

ज्ञानमुरली पूर्ण होताच बाबा म्हणाले, 'आज तोच वत्स सभेत प्रसाद (टोली) वाटेल जो महावीर असेल.' परंतु कुणीच उठले नाही. माझ्याच्याने राहावले नाही. जेव्हा बाबा तिसऱ्यांदा म्हणाले, तेव्हा मी उठलो आणि निघालो टोली वाटायला. टोली वाटून झाल्यावर मी बाबांसमोर गेलो, बाबांनी मला त्यांच्या सोबत गादीवर बसवलं व माझ्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत म्हणाले, 'ये है मेरा शेर बहादुर बेटा!' बाबा सिंहाच्या गुणांचं वर्णन करत म्हणाले, 'मुला, सिंह निर्भय राजासारखा असतो, तो एकटाच जंगलात वावरतो, फिरतो आपली पावले कधीच मागे घेत नाही.' निर्भयता व निश्चिंततेचं हे वर्णन माझ्यासाठी वरदान बनले. हे वरदान यज्ञसेवेत जबाबदाऱ्या सांभाळताना नेहमी मला साथ देते.

विश्वकिशोर भाऊ ऑपरेशनसाठी मुंबईच्या इस्पितळात दाखल होते. एके दिवशी बाबांनी विश्वकिशोर भाऊंना योगदान देण्यासाठी सामूहिक योगाभ्याचा कार्यक्रम ठेवला. ही गोष्ट आहे एप्रिल १९६८ ची! बाबा स्वतः सकाळीच ६.०० वाजता आसनस्थ झाले. सर्व ब्रह्मवत्सही बाबांच्या समोर योगासाठी येऊन बसले. दुपारी १२.०० वाजेपर्यंत बाबा गादीवर एकरस स्थितीत योगात बसलेले होते. ना बाबांनी पाय बदलले, ना त्यांचे शरीर हलले. फक्त सर्वांना दृष्टी द्यायला बाबांची दृष्टी चहुकडे फिरत होती. बाबांच्या ह्या स्थिर बैठकीने सर्वांना आश्चर्यचकित केले. हे महान दृश्य माझ्या डोळ्यांसमोर नेहमी येत असते आणि बाबांच्या समान स्थिती बनविण्याची प्रेरणा देते...!

श्रीकृष्णाच्या मदतीने पांडवांनी खांडववनास इंद्रप्रस्थ बनवले, असेच ईश्वराच्या आणि ब्राह्मण परिवाराच्या साहाय्याने जंगलामधे मंगल करून, शांतिवनाच्या निर्मितीसाठी भूपाल भाई कसे निमित्त बनले ही कथा ते स्वतःच सांगायचे. 'ज्ञानमुरलीत शिवबाबा सांगत भविष्यात सेवेची अफाट वृद्धी होईल व इतकी मुले येतील की आबू रोड पासून माऊंट आबू पर्यंत रांग लागेल, तेव्हा माझं चिंतन चालत असे कि इतके सारे भाऊ-बहिणी येणार, पण पिण्याच्या पाण्याची व राहण्याची कोणतीच सोय नाही! कित्येकदा वर्षा ऋतुत भूस्खलन व दगड कोसळल्याने पर्वतीय रस्ता बंद होतो. आबू पर्वतावरील लोक वर आणि खालचे खालीच अडकून पडत. माझ्या मनात सारखा एकच संकल्प येत असे की डोंगर चढायच्या आधी आबू पर्वताच्या पायथ्याशी एखादे असे स्थान असावे, जिथे भाऊ-बहिणी थांबू शकतील आणि विश्रांती घेऊन माऊंट आबूला जाऊ शकतील. प्रकाशमणी दादींनी एक जागा घ्यायला होकार दर्शविला. मग दुसरी जागा घेतली आणि पाहता-पाहता शांतिवनची ५० एकर आणि आजूबाजूची शेकडो जमिनी घेतली गेली.

मला खूप आनंद वाटतो शिवबाबा व ब्रह्माबाबांनी मज आत्म्यास ह्या पुण्य कार्यासाठी निमित्त बनवले. शांतिवनामध्ये देश-विदेशातील लाखों ब्रह्मावत्स येतात, सुख-शांति-आनंद व पवित्रतेचा अनुभव करतात व संतुष्ट होऊन जातात. सेवा करते वेळी (गाडी चालवताना) अनेकदा जीवघेणे अपघात झाले, पण बाबांनी दरवेळी वाचवले. एकदा असाच अपघात झाला, त्यावेळी मन थोडे खट्टू झाले, मी अव्यक्त बापदादांना म्हणालो, 'बाबा, माझी सेवा बदला.' बाबा म्हणाले, 'मुला, तुम्ही सर्वांनी तन-मन-धन मला अर्पित केले आहे ना! मग सर्व काही माझ्यावर सोड. **(अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः...)**'

बाबांच्या या महावाक्याने मी पुरता निश्चिंत झालो की ईश्वरानेच जर माझी जबाबदारी घेतली आहे, तर मग मी का बरं घाबरु! तेव्हा पासून मी सदा बाबा आणि दादींचा आदर्श समोर ठेवून सेवा करत असतो.'

शांतीवन परिसरात ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या हीरक जयंतीनिमित्त अतिभव्य डायमण्ड हॉल बनला, ह्या भव्य सभागृहाचे ३१ डिसेंबर १९९६ रोजी नववर्षाचे आगमन होत असताना अव्यक्त बापदादांनी उद्घाटन केले. १०/१०/१९९७ रोजी अव्यक्त बापदादांनी शांतीवनला वरदान दिले. १) शांतीवन एयरपोर्ट (विमानतळ) बनेल, २) शांतीवन ब्राह्मणांच्या हितगुज आणि आत्मिक मौज करण्याचे रमणीक विहार बनेल. ३) शांतीवन ब्राह्मणांना उच्च स्थिती मधे घेऊन जाणारे ठिकाण बनेल. ४)शांतीवन नातेवाईक आणि सहयोगींना, मदतनिसांना जवळ आणेल, ५) ब्राह्मणांची श्रेष्ठ साधना अर्थात एकांतवासाचे साधन बनेल, ६) शांतीवन, आबूरोड दर्शनीय स्थळ बनेल, जसे ओमशांती भवन प्रवासी आकर्षण केंद्र बनले, ७) विभिन्न वर्गांचे मोठ-मोठे सेमिनार, स्नेह मिलनाद्वारे अनेक आत्म्यांना संदेश मिळेल, ८) आपतकाळामधे शांतीचं सुरक्षित स्थळ बनेल.

भूपाल भाईंच्या मन मंदिरात देशभक्तिचा अखंड दीप सदैव तेवत असे. त्यांच्या हृदय सागरात देशप्रेमाच्या लाटा उसळ्या मारत. त्यांच्या रोमा-रोमात समाजसेवा प्राणवायूसमान संचारलेली असे. त्या काळात दुष्काळाची स्थिती उत्पन्न होत असे, दुष्काळ व पूर परिस्थिती यासारख्या नैसर्गिक संकटाच्या वेळी भूपाल भाईजी मानवतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असत. आबूच्या आसपासच्या परिसरामधे, प्राण्यासाठी चारा तसेच पाण्याची व्यवस्था करत. उन्हाळ्यात शांतीवनच्या जवळच्या गावांमधे जल व्यवस्था व अन्य समस्या मिटवण्यात भ्राताजींचे योगदान अतुलनीय होतं. त्यामुळे ते अनेकांच्या आशीर्वादाचे पात्र बनले. भाईजी पूर्व मुख्यमंत्री अशोक गेहलोत, पूर्व मुख्यमंत्री वसुंधरा राजे व अन्य मंत्र्यांबरोबर मिळून-मिसळून समाजसेवा करत राहिले. त्यामुळे तत्कालिन सरकारने भाईंना संकट निवारण समितीचे सदस्य बनवले होते.

मज आत्म्यास (लेखकास) ही भूपाल भाईंचे स्नेह-सानिध्य लाभले. भाईजी जितके अनुशासन प्रिय होते. तितकेच ते स्नेही होते. खरे तर, ते विश्वावर समर्पित झालेले श्रीफल (नारळ) होते, ते बाहेरून शिस्तप्रिय (लॉफूल) वाटत, पण आतून तितकेचे कोमल सहृदयही होते. भाईंना साधेपणा व मितव्ययिता अतिप्रिय होते. यज्ञाचं एक रुपयाचं काम ५० पैशांमधे करून यज्ञाची बचतही करत. त्यांना निवासस्थानी चमक-धमक दिखावा अजिबात आवडत नसे. एकदा माझ्या परिक्षेचा क्षण होता, मला हिंमत देत म्हणाले, 'हेमंत, शिवबाबा तुझ्या पाठिशी आहेत, चिंता करू नकोस, सर्व काही ठीक होईल.' खरोखर त्यांच्या सकारात्मक उद्गारांनी मी त्या परिक्षेत पास झालो. आम्ही युवा प्रभागाद्वारे संचालित 'टच द लाईट प्रोजेक्ट'च्या अंतर्गत शाळांमधे सेवार्थ जात असू, तेव्हा मनापासून सेवा समाचार ऐकून आमचा उत्साह वाढवत. त्यांचे ईश्वरी सेवेवर नितांत प्रेम होते.

शांतिवन रिसेप्शनचे नारायण भाई भूपाल भाईंची वैशिष्ट्ये सांगतात, 'भाईजी बाबा आणि यज्ञाविषयी प्रामाणिक होते. त्यांच्या सारखा दयाळू मनुष्य मी पाहिला नाही. ज्यांना कुणी आधार देत नसे, त्यांना भाईजी सेवा देऊ करत. कुणाकडून चूक झाली तर त्याच्याकडून लिहून घेत. मी विचारत असे, 'भाईजी त्यांच्याकडून का लिहून घेतलं?' ते म्हणत, 'चुकीची जाणीव होऊन सुधार व्हावा यासाठी!' नंतर लिहून घेतलेलं फाडून टाकून विसरून जात आणि समजूत काढून भविष्यात चूक न करायची समज देऊन सेवाही देत. मनात कुणाविषयी कधीच द्वेष, घृणा अथवा तिरस्कार बाळगत नसत. संकटकाळी निःस्वार्थ भावनेने मदत करत. सेवेसाठी जाताना मला नेहमी सोबत घेऊन जात, परंतु कोणत्याही ठिकाणी जास्त वेळ थांबत नसत. सेवार्थ जायचं आणि सेवा करून लगेच मधुबनमध्ये परत जायचे. खरे तर ते विश्व वैरागी होते. कुणी यज्ञासाठी काही आर्थिक सहयोग दिला तर लगेच ईशु दादींना देत. यज्ञात आधी गाड्या नव्हत्या, म्हणून मिल्ट्रीचे जुने ट्रक घेऊन चालवत. त्यांची भावना होती आबूरोडहून दिल्ली जाते वेळी जिथे-जिथे रस्त्यात थांबावे लागते, तिथे-तिथे सेवाकेंद्र असले पाहिजे. ह्या उद्देशाने भूपाल भाईजी पाली, सिरोही, जालोर, डूंगरपूर, स्वरुपगंज, फालना इत्यादी सेवाकेंद्र स्थापन करायला निमित्त बनले. सेंटरमधे एखाद्या वस्तुची गरज भासली तर लगेच पोहचवत.'

शांतीवनचे खोमन भाई भूपाल भाईंजींची वैशिष्ट्ये सांगतात, 'योगी

जीवन कसं जगावं, हे मी भूपाल भाईंकडे पाहून शिकलो. भाईजी योग व सेवेत नेहमी समतोल ठेवत. त्यांच्या खोलीत ब्रह्माबाबांचे ट्रांसलाईट होते. संध्याकाळी भाईजी आणि त्यांच्या सोबत सेवेत असलेले सर्व भाऊ योग करत आणि एक भाऊ योग करवत असे. भाईजी म्हणत, 'सेवा आहे जास्तीची कमाई! मात्र योग आहे मूळ कमाई. ते म्हणत, 'तुम्ही मला सेवेत जेवढं निर्विघ्न ठेवाल, तेवढा तुमचा माझ्या सेवेत वाटा बनेल, माझ्याप्रमाणेच तुमच्याही सेवेत वाढ होईल. नेहमी हेच समजा की तुम्ही यज्ञ सेवा करत आहात! यज्ञसेवा समजल्याने भाग्य बनेल.' भाईजी आम्हाला नेहमी सेवेत व्यग्र करून म्हणत, 'सेवा आहे पद्मांची कमाई! जितके सेवेत व्यग्र रहाल, तितकी तुमच्या मन-बुद्धिची एकाग्रता वाढेल, नाही तर व्यर्थ चिंतन चालत राहील.'

भूपाल भाईंचे एक वैशिष्ट्य, 'त्यांची दृढता!' एकदा जो संकल्प केला, जे बोललं, ते भाईजी करून दाखवत. यज्ञात एखादे संकट उभं राहिले तर प्रकाशमणी दादी, निर्वैर भाईजी भूपाल भाईंनाच सांगत. भाईजी ते कार्य पूर्ण करूनच श्वास घेत. समूहात मान-अपमानाला तोंड द्यावे लागते, परंतु भाईजी मान-अपमानापासून मुक्त असत. कधी कार्यक्रमाचे निमंत्रण जरी मिळालं नाही तरी ते स्वतःहून जात. आम्ही म्हणायचो, 'भाई साहेब, आपल्याला बोलावले नाही तर का जाता' ते म्हणत, 'कार्यक्रम कुणाचा आहे? बाबांचा आहे ना! जर मी गेलो नाही तर सेवेपासून वंचित राहीन.' भाईजी निंदा-स्तुतित समान, सदैव एकरस असत. ते नेहमी बाबांना पाहुनच यज्ञ सेवा करत.

भाईजी कमालीचे निद्राजीत होते. ते रोज अमृतवेळेला २ वाजता उठून योग करत, कधी-कधी तर रात्र-रात्र जागून तपस्या करत, कार्यक्रमास वीस मिनिटं असतील तर ते म्हणत, 'मला वीस मिनिटांनंतर उठव, ते १५-२० मिनिटे झोप घेत. आम्ही त्यांना उठवायला जायच्या आधीच ते उठून बसत. झोपताना कधीही मोबाईल स्विच ऑफ करत नसत. माझ्यापाशी मोबाईल देऊन सांगत की कुणाचा फोन आला तर प्रेमाने सांग की भाईजी आराम करत आहेत.' भाईजी वेळचे भान राखत. ते वेळेआधीच पोहोचण्याचा प्रयत्न करत. घड्याळ पाच मिनिट पुढे सेट करून ठेवत. ते म्हणत, 'कोणत्याही कामाला उशीर कराल तर कार्यात संकटे येतील. म्हणून भाईजी नेहमी वेळे आधी निघत.

शांतीवनची भूमी घेण्यासाठी सुरुवातीला भाऊ-बहिणींचे एकमत नव्हते. ब्रह्मावत्स हाच विचार करत की जंगलात कोण राहील? तसेच सरकारी कायद्याप्रमाणे आदिवासींची जमीन कुणीही खरेदी करू शकत नाही. पण आदिवासी स्वेच्छेने स्वतःची जमीन दान करू शकतात. सुरुवातीला महारथींना शांतीवन मधे राहणं थोडे अवघड वाटे. झोनल इंचार्ज व वरिष्ठ भाऊ-बहिणीं येत, त्यांना स्वतः फोन करून भाईजी विचारपूस करत काही अडचण तर नाही ना! आम्हाला फळं घेऊन त्यांच्याकडे पाठवत. भाईजी सर्वांचा मनापासून मान ठेवत, सर्व मोठ्या भाऊ-बहिर्णींना योग्य तो मान देत.

भ्राता भूपाल भाईजी शांतीवनचे मुख्य सेवाव्रती होते, शांतीवनच्या निर्माणासाठी निमित्त बनले होते. पाणी कमी पडू नये ह्याची काळजी घेत. भाईजी टैंकर्सद्वारे पाण्याचा साठा करत व जलप्रबंधनावर जातीने लक्ष ठेवत. भाईजी निसर्ग प्रेमीही होते, त्यांनीच शांतीवन व अन्य ठिकाणी वृक्षारोपण करून वनराई द्वारे हिरवळ निर्माण केली होती. असे यज्ञरक्षक, सर्व स्नेही, अतिप्रिय भूपाल भाईजी २० डिसेंबर २०२२ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून अव्यक्त वतनवासी झाले.

***

(पृष्ठ क्र. १० वरून)

ही संकल्प करावा. नजिकच्या येणाऱ्या काळात ह्याच कवचामुळे अदृश्य शक्तींपासून ही रक्षण होईल. हे सुरक्षा कवच तुम्ही आपल्या घराभोवतीही तयार करू शकता. सेंटरच्या ही आणि स्वतःच्याभोवती करू शकता. अशाने कोणतीही नकारात्मक ऊर्जा कवचाच्या आत प्रवेश करणार नाही.

अमृतवेळेस उठताच पाय जमिनीवर ठेवण्याआधी जेव्हा अंतर्मन जागृत असते, तेव्हाच बाबांना सुप्रभात करून हा संकल्प करा, बाबांचे आवाहन करून हे सुरक्षा कवच घालून ठेवा आणि सुरक्षित राहा. अशा अभ्यासाद्वारे मी माझ्या कौटुंबिक अडचणींना तोंड देताना अविचल राहू लागले. मुलगी म्हणून माझी जी कर्तव्ये बजावायची होती ती निभावता आली. त्याचसोबत राजयोगाची साधना वृद्धिंगत करता आली. मन खंबीर बनत आहे याचा प्रत्यय येत राहतो.

***



# पर्यावरणासंबंधी काही वेचे

काही धर्मग्रंथात पर्यावरण, वृक्षसंपदा याबाबत रंजक माहिती बघायला मिळते. त्यातील वेचे आपल्यासमोर ठेवत आहोत. - संपादक

प्राचीन भारतीय चिकित्सा पद्धतीच्या प्रमाणे पृथ्वीवर अशी कोणतीच वनस्पती नाही, जी औषधी गुणधर्मांनी युक्त नसेल.

स्कंद पुराणात एक सुंदर श्लोक आहे -

'अश्वत्थमेकम् पिचुमंदमेकम् न्यग्रोधमेकम् दश चिञ्चिणीकान्।

कपित्थबिल्वाऽऽ मलकत्रयञ्च पञ्चाऽऽम्रमुप्त्वा नरकन्न पश्चेत्।।

अश्वस्थः - पिंपळ (१००% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

पिचुमंदः - कडुलिंब (८०% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

न्यग्रोधः - वटवृक्ष (८०% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

चिञ्चिणी - चिंच (८०% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

कपित्थः - कवठ (८०% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

बिल्वः - बेल (८५% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

आमलक - आवळा (७४% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

आम्र - आंबा (७०% कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेते)

उप्ति म्हणजे झाड (रोप) लावणे.

अर्थात - जो कुणी ह्या वृक्षांची रोपे लावून, त्यांची काळजी घेऊन त्यांना वाढवेल, त्यांना नर्काचे दर्शन कधीच करावे लागणार नाही.

उपरोक्त शिकवणूकीचे पालन न केल्यानेच आज आपल्याला ह्या परिस्थितीरुपी नर्काचे दर्शन करावे लागत आहे.

अजूनही काही बिघडलेले नाही, आपण अजूनही आपली चूक सुधारु शकतो. गुलमोहर, निलगिरी - यांसारखी झाडे आपल्या देशाच्या पर्यावरणास घातक आहेत. पश्चिमी देशांचे अंधानुकरण करून आपण आपले फार नुकसान करून घेतले आहे.

पिंपळ, वड आणि कडूलिंब यांसारखी झाडे न लावण्याने जिथे तिथे दुष्काळ पडण्यात वाढ होतेय. ही सर्व झाडे वातावरणात ऑक्सिजनचे प्रमाण वाढवतात, त्याचबरोबर जमिनीचे तापमान ही कमी करतात. आपण ह्या झाडांची पूजा करायच्या परंपरेला अंधश्रद्धा म्हणून आणि पाश्चात्य संस्कृतीच्या मागे लागून ह्या वृक्षांना न लावता गुलमोहर, निलगिरी सारखी पाश्चात्य झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावणे सुरू केले. निलगिरीची झाडे झपाट्याने वाढतात. पण ही झाडे जमिनीतील पाण्याचा साठा शोषून घेऊन, जमीन कोरडी करण्यास कारणीभूत ठरतात. म्हणूनच ज्या ठिकाणी दलदल आहे, अशाच ठिकाणी ही झाडे लावणे योग्य ठरते. इतर ठिकाणी ही झाडे लावल्यास जमिनीतील पाण्याचा साठा कमी होतो. म्हणूनच मागील ४० वर्षात निलगिरीची झाडे जास्तीत जास्त लावली गेल्याने पर्यावरणाची हानी झालेली दिसून येते.

शास्त्रांत पिंपळाच्या झाडाला राजा म्हटले गेले आहे.

श्लोक - मूले ब्रह्मा, त्वचा विष्णू, शाखा शंकरमेवच।

पत्रे पत्रे सर्वदेवायाम् वृक्ष राज्ञो नमोस्तुते।।

भावार्थ :- ज्या वृक्षाच्या मूळात ब्रह्माचा, खोडात श्री हरी विष्णू आणि फांद्यावर शंकराचा वास आहे, तसेच त्याच्या पानापानांवर सर्व देवतांचा वास आहे, अशा वृक्षांच्या राजाला, पिंपळाला माझा नमस्कार असो.

येत्या काही वर्षांत प्रत्येक ५०० मीटरच्या अंतरावर जर एक-एक पिंपळ, वड, कडूलिंब यांसारख्या वृक्षांचे रोपण केल्यास आपला भारत देश सहज प्रदूषण मुक्त होण्यास मदतच होईल.

तसेच प्रत्येक घरा-घरांत तुळशीचे रोप लावावेच.

(पृष्ठ क्र. २० वर)



# यशाचे अचूक उपाय

शब्दांकन : ब्र.कु. बाळू, सोलापूर

**ब्रह्माकुमारीज संस्थेच्या शांतिवन मुख्यालयात गॉडलीवूड स्टुडिओद्वारे 'फिअरलेस फ्रायडे' नावाची एक मालिका निर्माण करण्यात आली होती. त्यातील महत्त्वाच्या मुद्यांचे संकलन येथे देत आहोत.**

**१) कोणत्याही परिस्थितीत निर्भय होऊन कसे तोंड द्याल?**

जेव्हा आपण एखाद्याला हताश आणि घाबरलेले बघतो, त्यावेळी आपण त्यांना त्यांच्या शक्तीसामर्थ्यांची आठवण करून द्यायला अथवा प्रेरित करण्यासाठी बऱ्याच वेळा सिंहाचे उदाहरण देतो. पण तुम्हाला खरंच माहिती आहे का, सिंहाला एवढे शक्तीसंपन्न बनवणारी गोष्ट कोणती? तर त्याचे कारण म्हणजे की सिंहाला ह्याची पूर्ण कल्पना असते, की तो जंगलाचा राजा आहे आणि राजाला नेहमीच आपल्या शक्तीची जाणीव असते. ही जाणीव त्याला निर्भय बनवत असते. चला तर मग आपण आजपासूनच आपल्यातील (आंतरिक) शक्ती वाढवण्यासाठी एक योग्य निर्णय करूया – सदा शक्तीशाली, सकारात्मक विचार करण्याचा सार्थ निर्णय. असे केल्यास लवकरच तुमच्या लक्षात येईल, की कोणत्याही बाह्य परिस्थितीला आपण निर्भयपणे तोंड देऊ शकू.

**२) आयुष्यात यश मिळवायचे असेल तर कधीही गर्व (अहंकार) बाळगू नका.**

तुम्ही कधी फळांनी डवरलेले झाड बघितले आहे का? जेवढी जास्त फळे तेवढेच ते जास्त झुकलेले असते. पण ह्याच्या एकदम विरुद्ध आजचा मनुष्य वागतोय. जेवढे तो सुखसुविधांची साधने शोधतोय, तेवढाच तो एकटा आणि दु:खी होतो आहे. कारण आपण जेवढे पुढे-पुढे जात राहून यशाची शिखरे पादाक्रांत करतोय. तेवढा-तेवढा आपला त्या साधनांत मोह ही वाढत जातोय. आपण त्या साधनांच्या मोहजाळात इतके गुरफटतोय की त्यातून बाहेर पडणे कठीण होऊन बसले. ती साधने नेहमी आपल्या कडेच राहावीत असेही वाटत राहते. साधनांमुळे मिळालेले यश, त्यामुळे मिळालेला नावलौकिक आपण घालवू इच्छित नाही. कारण हेच आपल्याला जगात नवी ओळख करून देत असते. हेच मोहजाळ मग आपल्या गर्वाचे कारण बनते. म्हणूनच जेवढी यशाची उंच उंच शिखरे, तेवढेच आपले पायही जमिनीवर राहावेत म्हणजे नम्र राहावे. याद्वारे अनेक लोकांचे आशिर्वाद मिळतील. त्यासाठी नेहमी लक्षात ठेवा माझे यश हे ईश्वराच्या आशीर्वादाचे फळ असून मी ईश्वरी खजिन्यांनी संपन्न आत्मा आहे. मग जीवनातील कोणत्याही गोष्टींत तुम्ही गुरफटून राहणार नाहीत. सर्वांपासून मुक्त राहाल.

**३) 'आत्मविश्वास'**

आयुष्यात बऱ्याच वेळा असेही लोक भेटतात, जे आपले मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न करतात. असूयेपोटी आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे अशा परिस्थितीत आपण एकाकी होऊन जातो. आत्मविश्वास डळमळीत व्हायला लागतो. स्वत:ला कमी लेखू लागतो. आपण भीतीने ग्रासले जातो-वाटते मी यशापासून दूर जातोय की काय? अपयशाची भीती आपल्याला आपल्या खऱ्या शक्तींपासून वंचित करते. परंतु आयुष्यात पुढे जाण्यासाठी आपल्याला दृढ निश्चय, स्वत:च्या क्षमतेवर विश्वास आणि ईश्वरावर भरोसा ठेवावा लागेल. आणि हे आवर्जून लक्षात ठेवावे कुणाही व्यक्तीला लेबल चिकटवू नये की तुम्ही कोण आहात? जो तो आपल्या मनात दुसऱ्याबद्दल प्रतिमा निर्माण करून त्याबद्दल बोलत असतो. पण तुमच्या स्वत:च्या खऱ्या व्यक्तीत्वाबद्दल त्याला माहिती

असेलच असे नसते. त्यामुळे निर्भय बना, स्वत:वर विश्वास ठेवा. पुढे चालत राहा.....

**४) 'काल्पनिक भय' म्हणजेच व्यर्थ भीती कशी दूर कराल?**

भीती नेहमीच काल्पनिक असते फीअर म्हणजे फॉल्स एव्हिडंस ॲपिरींग रीअल. काल्पनिकतेतून बाहेर पडण्यासाठी वास्तवाला सामोरे जावे लागेल. स्वत:ची खरी ओळख – की मी म्हणजे हे नश्वर देह नसून ह्या देहाला चालवणारी एक चेतना, एक शक्ती– आत्मा आहे. स्वत:ची खरी ओळख आणि त्याची अनुभूति– देह, वस्तू, वैभव यांची अनिश्चितता, तसेच त्यांना आपण गमवून तर बसणार नाही ना! ही भीती. जेव्हा आपण आपल्या खऱ्या स्वरुपात स्थित राहून, त्या परमशक्ती परमेश्वराशी जोडले जातो, तेव्हा आपणही 'त्या'च्याच सारखे सर्व गुण आणि शक्तींनी भरपूर व्हायला लागतो. ह्याचा सारखा-सारखा अभ्यास केल्यास आपल्याला आंतरिक समृद्धी आणि निश्चिंततेचा अनुभव व्हायला लागतो. चला तर मग आयुष्याच्या ह्या प्रवासात ईश्वराला खऱ्या स्वरुपात ओळखून 'त्या'ला आपला मित्र-सखा बनवू या. आयुष्याचा आनंद लुटू या..

**५) 'आपले साध्य कसे गाठाल?'**

अनेक वेळा आपण आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य वेळेची वाट बघत असतो. आपण त्यासाठी वेळोवेळी स्वत:ला प्रेरितही करत असतो. त्या दृष्टिने अनेक योजनाही बनवत असतो. पण काही एका प्रतिकूल परिस्थितीमुळे आपण एकाच जागी थांबून जातो. दिवसामागून दिवस जातात, आणि एक अशीही वेळ येऊन ठेपते, की त्या ठिकाणाहून आपण निर्धारीत केलेले लक्ष्य कठीण वाटायला लागते. ह्याचे खरे कारण आपलेच नकारात्मक विचार. आपण यशासाठी नेहमीच सरळसोट आणि सरधोपट मार्गाची अपेक्षा करत असतो. म्हणूनच आपण त्या कामासाठी आपले उत्तम प्रयत्न देऊ शकत नाहीत. चला तर मग अशा कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपण आपल्या मनाला तयार करूया. रोज सकाळी स्वत:ला (श्रेष्ठ) उच्च अशा विचारांत स्थित करून परमात्म पित्याकडून सर्व शक्ती, गुणांची प्राप्ती करूया. त्याने काय होईल? आपण विपरीत परिस्थितीत न थांबता, थेट आपल्या लक्ष्यापर्यंत जाऊनच विश्रांती घेऊ.

**६) 'घडून गेलेल्या गोष्टी स्वीकारून पूर्ण विराम द्यावा'**

आजकाल माणसाला त्याच्या भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींची भीती वाटत असते, किंवा मग भविष्याची काळजी म्हणूनच मग अशा व्यक्ती वर्तमानात घडत असलेल्या गोष्टींचा साधा आनंदही घेऊ शकत नाही. भूतकाळात कितीही वाईट घटना घडून गेल्या असतील, त्यामुळे फार दु:खही झाले असेल – पण आपण एक गोष्ट विसरतो ती म्हणजे अशा नकारात्मक गोष्टींकडूनही आपण खूप काही शिकू शकतो. ज्या गोष्टी मग पुढील आयुष्यात त्याच-त्याच चुकांपासून सावध करतील. आणि त्याच-त्याच गोष्टी परत-परत उगाळून फायदा नसतो. फुकट आपला वेळ, शक्ती (मानसिक) वाया जातात, त्याचा परिणाम शरीरावरही दिसून येतो – म्हणूनच ह्या सर्वांपासून वाचायचे असल्यास घडून गेलेल्या गोष्टींना स्वीकारा. तेथेच त्यांना पूर्णविराम देऊन विसरून जावे. त्यामुळे वर्तमानाचाही आनंद घेत आयुष्य अजून चांगले बनवू शकतो – मग आपले भविष्य स्वत:च अधिकाधिक चांगले होत जाईल. जरी भविष्यात कोणत्या अडचणी आल्या तरी, त्या घटनांना परीक्षा न समजता, आयुष्याचा धडा शिकवणारा शिक्षक समजून निश्चिन्त मनाने पुढे जाता येईल.

**७) 'आयुष्यातील प्रभाव'**

फोमो : फीअर ऑफ मिसिंग आऊट म्हणजेच काही गोष्टी हातातून सुटून जाण्याची भीती – ही भीती आपल्या आयुष्यावर एक खोलवर प्रभाव टाकू शकते. त्यामुळे हा भ्रम निर्माण होतो, की दुसऱ्यांना मिळणारे सुख, आनंद त्यांना मिळणाऱ्या शुभ संधी आपल्या जीवनात मात्र नाहीत. असा विचार करून आपण दु:खी होत जातो. मागील कितीतरी वर्षांपासून ह्याच भीतीमुळे विशेषत: तरुणवर्गात अनेक नकारात्मक मानसिक लक्षणं दिसून येत आहेत. आपण हे विसरता कामा नये, की आपल्या आनंदाचे निर्माता आपणच आहोत. दुसरा-तिसरा कुणीही व्यक्ती वा बाह्य प्राप्ती नाही. आपल्याला योग्य निर्णय आणि मूल्यनिष्ठ आयुष्यामुळे सुखी आणि आनंदी जीवनाचा मार्ग सापडतो, तसा अनुभव होत राहतो. स्वत:ची योग्य ओळख मी कोण? आत्मा स्वत:तील गुणांना ओळखून आपण आपल्याला वाटणारी भीती दूर करू शकतो. तसेच त्यामुळे संपन्न आणि समृद्ध सुखी जीवनाकडे मार्गक्रमणा करू लागतो.

**८) 'राजयोगाचा अभ्यास'**

जेव्हा आपण गाडी चालवण्यास शिकत असतो, त्या काळात आपण फार काळजीपूर्वक मन लावून चालवत

असतो. जेणेकरून आपण खूप छान प्रकारे गाडी शिकू शकू, कुठलाही अपघात होऊ नये याची खबरदारी घेत असतो. पण हळूहळू जसजसे गाडीवर चांगल्या प्रकारे ताबा येऊ लागतो, तेव्हा साहजिकच खूप रहदारीच्या रस्त्यावरही आपण लीलया गाडी चालवायला लागतो, तरीही कधी-कधी अपघात होतातच. याचप्रमाणे आजकालच्या निरनिराळ्या साधनांच्या युगात लोकं आपल्या मन आणि इंद्रियावरचा ताबा हरवून बसलेले आहेत. कारण आपण आपल्या नातेसंबंधात वा आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर वाद-विवादांचा अनुभव करत असतो. राजयोग ध्यान-धारणेच्या सततच्या अभ्यासाने आपण परत एकदा आपल्या मन-बुद्धीचा ताबा घेऊ शकतो. तसेच अडी-अडचणींवर मात करून, निर्भय बनून पुढे जाऊ शकतो.

**९) 'जागरूक मन'**

आजकाल बरेचसे लोक आपले शारीरिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी मुख्यत: आपल्या आहाराकडे जास्त लक्ष देत, जागरुक होत आहेत. त्यामुळे अनेक जण आहारतज्ज्ञ होऊ इच्छितात, त्याचे योग्य ते शिक्षण घेत आहेत. आपणाला हे खूप चांगल्या प्रकारे माहिती आहे की, पोषकतत्वांनी म्हणजेच जीवनसत्वांनी युक्त आहार शरीराला आरोग्यदायी बनवतो. त्याउलट असंतुलीत आहार (चाट, चायनीज, रस्त्यावरील गाड्यांवरचे अन्न) शरीराला रोगी बनवत असतो. पण मला सांगा आपण खरंच आपल्या मनाचीपण एवढी काळजी घेतो का? जे आपण बघतो, ऐकतो, विचार करतो - तेच मनाच्या आहाराच्या रूपात स्वीकारले जाते. ज्याने मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. म्हणूनच मनाला कोणता आहार आरोग्यदायी बनवेल? तर तो आहे आध्यात्मिक, सकारात्मक आणि सूचनात्मक माहीतीयुक्त विषयांचा अभ्यास करून, चिंता, भय, मानसिक आजारांपासून वाचवून स्वत:ला सशक्त बनवावे.

**१०) 'अध्यात्म आणि सकारात्मकता'**

अध्यात्म म्हणजे वयाच्या ६० नंतर करावयाची गोष्ट असेच बहुतेक लोक समजत असतात. परंतु खरे पाहिले तर याची गरज आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक क्षेत्रात आहे असेच दिसून येते. आध्यात्मिकता आपल्या विचारांत सकारात्मकता आणते. तसेच मन-बुद्धीची एकाग्रता वाढवते. म्हणूनच अध्यात्माची आवश्यकता बाल-युवा-वृद्ध, विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार सर्वांनाच आहे. कारण प्रत्येकालाच बाह्य परिस्थितींना तोंड द्यावे लागते. अडी-अडचणींचे समाधान करण्यासाठी अध्यात्म आपल्याला आंतरिक बळ देत असते. चला तर मग आपण भौतिकतेबरोबरच आध्यात्मिक जीवनालाही महत्त्व देऊन आपल्या जीवनाला सहज-सोपे, सकारात्मक आणि चिंतामुक्त बनवू या.

(क्रमशः)

***

---

(पृष्ठ क्र. १७ वरून)

आपण सर्वांनी मिळून जर प्रयत्न केले. तर आपल्या भारताला नैसर्गिक आपत्तींपासून वाचवू शकू. भविष्यात मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक ऑक्सिजन मिळवायचा असेल, तर त्यासाठी आजपासूनच अभियानास प्रारंभ करणे अत्यंत गरजेचे ठरेल.

चला तर मग आपण पिंपळ, वड, बेल, कडूलिंब, आवळा, आंबा यांसारख्या झाडांचे रोपण करून येणाऱ्या पिढीला निरोगी तसेच 'सुजलाम् सुफलाम् - पर्यावरण' देण्याचा प्रयत्न करुया.

***

---

## सुविचार

- ❋ काल ज्यांनी तुम्हाला दुखविले त्यांना क्षमा करा. पण ज्यांनी तुमच्यावर प्रेम केले त्यांचेही आभार मानायला विसरू नका.
- ❋ जो भूतकाळ तुम्हाला दु:खी करतो तो विसरायला शिका आणि त्या वर्तमानावर लक्ष्य केन्द्रित करा, तो तुम्हाला सुखी राहण्यास मदत करेल.
- ❋ दु:ख विसरा, पण त्यातून मिळालेला धडा विसरू नका.

# मृत्यू एक गूढ

**ब्र.कु. मधुरा, ठाणे**



मरण हे एक अटळ सत्य आहे. पण तरीही आपण प्रत्येक जण ह्या शरीराला अमर, चिरतरुण बनवण्यासाठी आयुष्यभर झटत असतो. सकाळी उठल्यापासून ह्या पोटाची इवलीशी खळगी भरण्यासाठी आपण सर्व कर्मे करतो. जणू काही हे शरीर अमर आहे आणि चिरंतन कार्यरत राहणार आहे! पण जेव्हा आपण मृत्यू पाहतो तेव्हा आपल्याला जाणीव होते एक ना एक दिवस हे सर्व संपणार आहे. आणि मग आपल्याला वैराग्य येते. पण तेही क्षणिक असते. शरीराची आसक्ति इतकी जबरदस्त आहे की माणूस परत त्याच सुख दुःखाच्या व्यूहात गुरफटतो आणि घेरी येईपर्यंत त्यात गोल गोल फिरतो.

मग आता जरा विचार करूया की मृत्यू हा खरंच मानवाचा शेवट आहे का? जर विनाशी देह मृत्यूनंतर संपतो तर मग आपण मुक्तीच्या व सद्गतीच्या शुभेच्छा कोणाला देतो? कैलासवासी, स्वर्गवासी हे उद्‌गार कोणाला संबोधून काढतो? ह्यातून हाच निष्कर्ष निघतो, मृत्यूमुळे जरी मनुष्य शरीराचा नाश होत असला तरी आत्म्याची यात्रा पुढे चालू राहते. म्हणूनच तर मृत्यूनंतर काही विधी केले जातात जेणेकरून त्या आत्म्याची पुढील यात्रा सुखकर व्हावी.

पण ह्या प्रवासाची दिशा काय आहे आणि त्याचे अंतिम लक्ष्य काय आहे ह्याचा विचार आपण केला आहे का?

शास्त्रांप्रमाणे आत्मा हा पितृलोक, स्वर्ग, नर्क इत्यादी लोकांमध्ये प्रवास करतो. काही समजुतींप्रमाणे आपले कर्मभोग भोगण्यासाठी आत्मा ८४ लक्ष योनींतून जन्म घेतो. वेद, पुराण, शास्त्र, धर्मग्रंथ इ. मध्ये अशा प्रकारचे वेगवेगळे मतप्रवाह नोंदवले आहेत.

पण इथे आपण जी चर्चा करणार आहोत आणि स्पष्टीकरण देणार आहोत त्याचा आधार परमात्म ज्ञान हेच आहे . स्वतः त्रिकालदर्शी परमपिता परमात्म्याने जी रहस्ये उलगडली आहेत त्यांच्या आधारे हे मुद्दे मांडले गेले आहेत.

केवळ परमेश्वरच एकमेव जन्ममरण विरहित आहे. म्हणजेच तो जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकत नाही ! आणि जो ह्या चक्रव्यूहातून बाहेर असेल तोच खरे ज्ञान देऊ शकतो आणि खरी दिशा दाखवू शकतो.

आपल्याकडे अशी म्हण आहे, स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही. म्हणजेच आपली समजूत ठाम आहे की मेल्यावर मनुष्यात्मा स्वर्गात जातो किंवा कोणी दुष्ट असेल तर आपण म्हणतो ह्याला नरकात सुद्धा स्थान नाही.

आत्म्याला शांती मिळावी याकरिता मृत्यूनंतर १३ दिवस काही ना काही विधी करण्यात येतात. पण बहुतेकांच्या मनात ह्या संकल्पनेबाबत गोंधळ असू शकतो. स्वर्ग कोठे आहे? स्वर्ग कुणी पाहिलाय? सदगति मिळते म्हणजे नक्की काय होते? मुक्ती मिळते म्हणजे आत्मा ह्या जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो का? फक्त ह्या शरीराच्या प्रपंचातून मुक्त होतो? असे प्रश्न आपल्याही मनात येत असतील नाही का?

स्वर्ग म्हटले की आपल्या डोळ्यासमोर कुठले चित्रे उभे राहते? एक असा लोक जिथे सुख समृद्धी भरपूर आहे, सर्व आनंदाने गुण्या गोविंदाने नांदत आहेत, सर्व जण रूप संपन्न, गुणवान आहेत. शिव परमात्म्याने आपल्याला सांगितले की सत्ययुगात आणि त्रेतायुगात संपूर्ण सृष्टी सत्त्वप्रधान होती त्यालाच स्वर्ग असे म्हणतात. आणि जसे जसे आपण द्वापर कलियुगात प्रवेश करतो तसे तसे मनुष्यामध्ये विकारांचा प्रवेश होतो, त्यामुळे सर्वच प्राणिमात्र तमोप्रधान होऊ लागतात. अशा तमोप्रधान सृष्टीलाच नर्क असे म्हटले जाते. ह्या सूत्रानुसार कलियुगाच्या अंती,

आपल्या समोर येणाऱ्या वेगवेगळ्या परिस्थितीच्या रूपात जे कर्मभोग आपण भोगत आहोत त्याच नरकयातना आहेत.

अनेक धर्मातील मतमतांतरे आपल्याला इथे तपासून पहावी लागतील. कारण आज आपल्याकडे माहिती खूप प्रचंड प्रमाणात आहे; पण ज्याद्वारे आत्म-परिवर्तन घडून येते तेच खरे ज्ञान असते. परमात्म्याने येऊन आपल्याला कर्म सिद्धांताचे ज्ञान दिले. मनुष्य आपल्या कर्माप्रमाणे त्याचे फळ भोगतो. हिंदू धर्माच्या समजुतीनुसार मनुष्य आत्मा ८४ लक्ष योनीतून जन्म घेतो आणि केलेल्या पापांचे क्षालन करतो. असाही एक समाज आहे की अनेक जन्मांच्या फेऱ्यातून गेल्यावर पुण्य कर्मांचे फळ म्हणून आत्म्याला मनुष्य जन्म मिळतो.

पण शिव परमात्म्याने दिलेल्या खऱ्या ज्ञानानुसार मनुष्यात्मा हा नेहमीच मनुष्याच्या शरीरात पुनर्जन्म घेतो. जसे आंब्याचे बी पेरले असता चिकूची फळे येऊ शकत नाहीत त्याच प्रमाणे मनुष्य शरीराचे बीज आत्मा, फक्त मनुष्य शरीरातच जन्म घेऊ शकतो. आत्म्याचे मूळ निवासस्थान हे परमधाम आहे आणि प्रत्येकाच्या वेळेनुसार (आणि कर्मानुसार) तो पृथ्वीतलावर येऊन मनुष्य शरीरात प्रवेश करतो. आयुष्यभर त्याच्या हातून चांगली वाईट कर्मे होतात आणि जेव्हा इथली सर्व कर्मबंधने संपुष्टात येतात तेव्हा हे शरीर सोडून तो पुढल्या प्रवासाला जातो. आपल्या कर्मफळानुसार नवीन शरीर घेतो आणि त्यानुसार सुख-दुःख भोगतो. म्हणजेच मृत्यू समयी त्याच्याबरोबर जाते ते फक्त त्याच्या कर्माचे खाते आणि त्याचे संस्कार.

जसे दर वर्षी १ एप्रिलला नवीन आर्थिक वर्ष सुरु होताच आपल्या खात्यात मागील वर्षीचा जमा आणि खर्च दोन्हीचा हिशोब नोंदवलेला असतो. त्याच प्रमाणे मागील जन्मात केलेले पाप हे खर्चाच्या बाजूला आणि पुण्य हे जमेच्या बाजूला आत्म्यासोबत पुढील जन्मात पुढील पानावर मांडले जाते. मग आपल्याला मिळालेले सुदृढ, सुंदर शरीर, चांगले नातेसंबंध, पैसाअडका, राहते घर, गाडी बंगला, नोकरी व्यवसाय हे सर्व आपले जमेच्या बाजूचे परतावे आहेत आणि त्याच बरोबर आयुष्यात येणारे शारीरिक दुखणी, अपघात, आर्थिक संकटे, निकटवर्तीयांचे अकाली मृत्यू इ. हे आपल्या खर्चाची बाजू आहे.

तर ह्यावरून हे स्पष्ट होते की आपल्या कर्माची फळे भोगण्यासाठी मनुष्य आत्म्याला पशु-पक्षी योनीतून जन्म घ्यायची गरजच नाही. ती सर्व कर्म फळे मनुष्य आपल्या पुढील जन्मात भोगतो. मनुष्य आणि पशु ह्यातील मुख्य फरक म्हणजे मनुष्य भावनाप्रधान प्राणी आणि बुद्धीजिवी आहे. पण सर्वच पशूंमध्ये भावना तीव्र स्तरावर नसतात. किंवा आपण असे म्हणूयात त्यांच्या भावना समजून घेण्याची मनाची तरलता मानवात नाही. त्यामुळे केलेल्या पाप-पुण्याचे भोग सुख दुःखात परिवर्तित होतात ते त्याला जाणवू शकत नाहीत. दुसरे असे एखाद्या मनुष्यात्म्याला आपली चूक सुधारण्याची संधी केवळ मनुष्य योनीतच मिळू शकते. ज्ञान व सुसंगतीने माणसाचे परिवर्तन शक्य आहे ते पशु योनीत शक्य नाही. उदा. नारदाच्या ज्ञानाने वाल्याचा वाल्मिकी झाला.

पुनर्जन्म आठवत असलेल्या काही व्यक्तींची उदाहरणे आपण वेळोवेळी ऐकतो. ह्या विषयावर बरेच शास्त्रीय संशोधनही झाले आहे. मनुष्याचे शरीर पंचमहाभूतांनी बनलेले असल्याने मृत्यू नंतर ते नष्ट होणारच. म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती पुनर्जन्माच्या गोष्टी सांगू लागते तर हे स्पष्टच आहे की शरीर नष्ट झाल्यावरही आत्मा सुरक्षित राहतो तो दुसरे शरीर घेतो. यावरून आत्म्याचे अस्तित्व सिद्धच होते. पुढील जन्मी जरी शरीराची ओळख बदलते उदा. चेहरा, नाव, गाव, कुटुंब, व्यवसाय, शिक्षण इ. पण स्मृती, आत्म्याचे अविनाशी अंग आहे, ती शाबूत राहते. आणि जेव्हा आत्मा एक शरीर बदलून दुसरे घेतो तेव्हा आपल्या बरोबर स्मृती घेऊन जातो.

सर्वांना जरी पुनर्जन्म आठवत नसला तरीही, विवेकनिष्ठ विचारांनी आपण असे उद्गार काढतो देवा कुठल्या जन्माच्या पापाची फळे देतो आहेस? म्हणजे अंतर्मनात कुठेतरी हा समज पक्का आहे, आपल्या पूर्वजन्मीच्या पापांची फळे आपल्याला कधी ना कधी भोगावी लागतात. एखादी धार्मिक, मूल्यनिष्ठ जीवन जगणारी, परोपकार करणारी व्यक्ती पाहिल्यावर आपण म्हणतो काय देवात्मा आहे! त्याउलट जेव्हा आपण आपण एखादे पापकर्म घडताना पाहतो तेव्हा आपल्याला वाटते जणू मनुष्यातील राक्षस जागा झाला आहे. तात्पर्य देव किंवा असुर ह्या वेगळ्या योनी नाहीत. तर संस्कार, विचार आणि कर्म यांच्यावर आधारित मनुष्याच्या वेगवेगळ्या अवस्था आहेत. सत्त्वप्रधान मनुष्यालाच आपण देवता म्हणतो आणि कर्मभ्रष्ट,धर्मभ्रष्ट विकारी

मनुष्याला असुर. देव-देवता म्हणजे मानवाचे उन्नत रूप किंवा सत्त्वप्रधान अवस्था.

मग अमरलोक म्हणजे काय व तो कोठे आहे? हनुमान, अश्वत्थामा, परशुराम इ. अमर किंवा चिरंजीव असल्याच्या कहाण्या आपण ऐकतो. पण जरा विचार करा - हे पंच महाभूताने बनलेले शरीर खरोखरच काही हजार वर्ष चिरंतन टिकू शकेल काय? तर नक्कीच नाही!

मग अमर असतो तो आत्मा. वर उल्लेखल्याप्रमाणे जेव्हा आत्म्याची उन्नती होते तेव्हा तो देव लोकात जन्म घेतो तिथे मृत्यूचे भय किंवा दुःख नसते. कारण तिथले लोक आत्माभिमानी असतात. एखादे वस्त्र बदलल्याप्रमाणे ते देह त्यागून दुसरा देह धारण करतात. म्हणजेच मृत्यूच्या वेदनेपासून ते मुक्त असतात. 'मृत्यू' ह्या घटनेचे भय तिथे नसल्याने देवता अमर असल्याचे म्हंटले जाते. तसेच निसर्ग नियमानुसार पूर्ण आयुष्य उपभोगल्यावर देह त्यागतात, अकाली मृत्यू नसतो म्हणूनही अमर शब्द वापरला जात असावा.

आजच्या कलियुगी जगात सर्वांनाच मृत्यूचे भय आहे. विज्ञानाने प्रगतीची कितीही मोठी झेप घेतली असली तरी त्याला काळावर नियंत्रण मिळविता आले नाहीये. विद्वान, श्रीमंत, लोकप्रिय नेता, अभिनेता, उद्योगपती असो किंवा सामान्य कारकून असो कोणालाच मृत्यू चुकलेला नाही. हे माहीत असूनही, मृत्यूपासून सुरक्षित राहण्यासाठी आपण जप, तप, यज्ञकांड ह्याचाही आधार घेत असतो. आजच्या घोर कलियुगात अशा बातम्या आपण ऐकतो की वडिलांच्या आधी मुलाला मृत्यू येतो आणि कुठलीही शक्ति मृत्यू टाळू शकत नाही. म्हणूनच ह्याला मृत्युलोक म्हणतात.

मग मुक्ती म्हणजे काय? सगळ्या दुःखांचा अभाव ह्यालाच आपण मुक्ति असे म्हणतो पण ती तर शरीर त्यागल्यावर मिळते. पण एक असे जीवन जिथे मनुष्य शरीर धारण करून, गृहस्थ व्यवहारात राहूनही आपण सर्व दुःखापासून मुक्त होऊ शकू त्यालाच जीवन मुक्ती असे म्हटले जाते. तर आपणालाही जर अशा मुक्त अवस्थेची अनुभूती घ्यायची असेल किंवा ह्याच जीवनात सर्व दुःखांपासून मुक्ती मिळवायची असेल तर राजयोगाच्या अभ्यासाद्वारे ते सहज शक्य आहे. समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकात वर्णन केले आहे - **'विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी'** तीच ही स्थिती साधनेच्या द्वारे प्राप्त करता येऊ शकते. अन्यथा मुक्तीविषयी अनेक जटिल कल्पना आपण पाहतो, वाचतो.

पुराणांमध्ये 'समुद्र मंथनाची' गोष्ट प्रसिद्ध आहे, त्यात समुद्रमंथनातून अमृत कुंभ बाहेर पडले असे वर्णन आढळते. देव व असुर दोघेही ते मिळवण्याची धडपड करू लागले. पण ह्या झाल्या दंतकथा. देवळामध्ये पुजारी देखील देव देवतांचे चरण धुवून, ते 'चरणामृत'भाविकांना देतात. तर हे अमृत म्हणजे नक्की काय आहे? व त्याचे एवढे महत्त्व का आहे? एखादे द्रव्य प्राशन करून खरोखरंच माणूस मृत्यूवर विजय प्राप्त करू शकेल? शिव पित्याने सांगितल्या प्रमाणे 'आत्मज्ञान' हेच ते 'अमृत' आहे त्यायोगे मृत्यूवर विजय मिळू शकतो. गीतेत सांगितले आहे की या ज्ञानाद्वारे माणूस मृत्युच्या भयापासून सुरक्षित राहील आणि अमरपद प्राप्त करेल. पण ह्याच्या मागे नक्की काय संदेश दिला गेलाय ते आपल्याला उलगडले आहे का? मृत्यूशय्येवर असणाऱ्या मनुष्याला गीता ज्ञान ऐकवतात त्याचे एक कारण- त्याने मरताना भगवंतांच्या स्मरणात राहून शांतपणे देह सोडावा हे आहे. आणि दुसरे असेही म्हटले जाते शेवटच्या क्षणी परमेश्वराचे ध्यान केल्याने आत्म्याला सदगती मिळते. पण जरा विवेकनिष्ठ विचार केल्यास आपणाला मान्य होईल की शेवटच्या घटकेला ऐकलेले ज्ञान आत्मा नक्कीच धारण करू शकणार नाही. कारण त्यावेळी त्याची मनःस्थिती बिघडलेली असते आणि पुरुषार्थ करण्यासाठी हातात वेळही नसतो.

म्हणूनच स्वपरिवर्तन करण्यासाठी आयुष्यभर ज्ञानाचे अध्ययन व धारणा करणे गरजेचे आहे. जो मनुष्य सातत्याने ज्ञान धारणा करून आपल्या विचारांमध्ये परिवर्तन आणेल तोच मृत्यूच्या भयापासून मुक्त होऊ शकतो.

कारण त्याला हे उमजेल की आत्म्याची निरंतर यात्रा चालू आहे आणि एक शरीर बदलून दुसरे घेणे ह्यालाच शरीराचा मृत्यू होणे असे म्हटले जाते. पण मी स्वतः एक अजर, अमर, अविनाशी आत्मा आहे. ह्या आत्मिक भानामध्ये स्थित असल्याने, अशा ज्ञानी मनुष्याची मृत्यूविषयीची भीती नाहीशी होईल. ह्या जन्मी केलेल्या सत्कर्म आणि साधनेद्वारे पुढल्या जन्मी आपण नक्कीच एका सत्त्वप्रधान जगात नवीन जन्म घेऊ ह्याबद्दल तो निश्चिंत असेल.

इथे एक गोष्ट नमूद करायला हवी-कलियुगी जगातील

प्रवचनकारांनी दिलेले ज्ञान हे माणसाला अमरपद देऊ शकत नाही हे, नक्की. कारण ते प्रवचनकार स्वतःच जन्म मृत्यूच्या फेऱ्यात अडकलेले आहेत. आणि म्हणूनच जेव्हा कलियुगाच्या अंतिम चरणात तो 'निराकार,परमपिता शिव' अवतरित होऊन ज्ञाना बरोबरच आत्मिक बळ भरतो तेव्हाच ते अमृत बनते. अशा 'ज्ञान अमृता'च्या प्राशनाने आत्म्यांना मुक्ति व जीवनमुक्ती मिळते.

तर इथे हा निष्कर्ष काढता येईल की ज्या देवात्म्यांनी ज्ञानार्जनाने आणि स्वपुरुषार्थाने अमरपद मिळविले आहे त्यांनी मृत्यूलाच जिंकले आहे. कारण जरी हे सर्व शरीराने आता अस्तित्वात नाहीत तरी जनसामान्यांच्या नित्य समरणात आहेत. पिढ्या न् पिढ्या आपण त्यांचे स्तवन, पूजन आणि स्मरण करतो. श्रीराम, श्रीकृष्ण, जगदंबा माता ह्यांची भक्ति देश विदेशात होते ह्याचे कारण ह्या आत्म्यांनी स्वतःला गुणवान बनवले. देह त्यागानंतरही कीर्तिरूपात ते लोकांमध्ये जिवंत राहिले. ब्रह्मचर्य व्रताच्या धारणेने त्यांनी आपले शरीर व कर्मेंद्रिय पवित्र बनवले. आणि म्हणूनच त्यांची स्मारके (म्हणजेच मूर्ती स्थापन केलेली देवळे) जगभर पाहायला मिळतात. एवढेच नव्हे तर त्यांचे जन्मस्थानही तीर्थस्थाने बनतात व त्यांचा जन्म दिवस उत्सवाच्या रूपात साजरा केला जातो. दैनंदिन जीवनात ह्या देवतांना मनुष्याच्या जीवनात अग्रस्थानी ठेवले जाते. अशा प्रकारे त्यांचे चैतन्य ह्या धरेवर कायम राहते. म्हणजेच एका अर्थाने ते मृत्यूवर विजय मिळवितात.

या शिवाय भारतीय इतिहासात आणि कथा पुराणांत आपण अशी अनेक योगी पुरुषांची उदाहरणे पाहतो त्यांनी स्व इच्छेने मृत्यूला कवटाळले. उदाहरणार्थ – ज्ञानेश्वर महाराजांनी घेतलेली जिवंत समाधी किंवा महाभारतमध्ये पितामह भीष्मांना मिळालेला इच्छा मृत्यूचा वर. ह्या योगी पुरुषांनी आपल्या योग बळाने प्रकृतीस वशीभूत करून घेतले होते. आपल्या ज्ञान साधनेमुळे, त्यांनी आपल्या इच्छेने देहत्याग केला. म्हणजेच मृत्यूचे भय व दुःख त्यांनी अनुभवले नाही. मनामधील सर्व विचारांना विराम देऊन, एकाग्र चित्ताने, एखादे वस्त्र उतरवावे त्या प्रमाणे त्यांचा आत्मा देह त्यागून गेला. आपण आपल्या मूळ निवासस्थानी, आपल्या परमपित्याच्या कुशीत जात असल्याचा अनुभव ह्या योगी आत्म्यांना होतो. ह्यालाच मुक्ति असे म्हंटले गेले आहे. ज्ञाननिष्ठ असल्याने आपला पुढील जन्म नक्कीच सुवर्ण काळात होईल ह्या खात्रीने ते आनंदाने मृत्यूला जिंकून आपला देहत्याग करतात.

असे म्हणतात जेव्हा सिकंदर मृत्यू पावला तेव्हा त्याचे हात रिकामे असल्याचे दाखविण्यासाठी ते त्याच्या प्रेतावर झाकलेल्या वस्त्रातून बाहेर काढण्यात आले. वास्तविक पाहता कोणी मनुष्य रिकाम्या हाताने ह्या जगातून प्रयाण करीत नाही. तो जरी स्थूल संपत्ती किंवा शारीरिक नाते–संबंध घेऊन जाऊ शकत नसला, तरी आत्म्यावर झालेले रेकॉर्डिंग अर्थात संस्कार त्याच्या बरोबर नक्कीच पुढे जाते. ह्या आयुष्यात केलेली कर्म, प्रत्येक परिस्थितीला दिलेली प्रतिक्रिया, रचलेले संकल्प ह्यांची छाप संस्कारांच्या रूपात आत्म्यावर नोंदवले जाते. आणि शरीर त्यागानंतरही ते तसेच अविनाशी राहते. नवीन शरीरात प्रवेश केल्यानंतर हेच रेकॉर्डिंग कर्माद्वारे व्यक्त होते.

एका उदाहरणाद्वारे हे स्पष्ट होईल– अशी कल्पना करा एखाद्या तबकडी (CD) वर आपण एखादे गाणे व काही संवाद ध्वनिमुद्रित केले. आता ती आपण दुसऱ्या एखाद्या संगणकात (computer) घालून वाजवली तरी तीच गाणी व संवाद ऐकू येतील. मग आता आपल्या आत्मा रुपी सीडीवर, जर आपल्याला न आवडणारे एखादे गाणे, मुद्रित झाले असेल तर, हीच ती वेळ आहे बदलण्याची. हा सृष्टी परिवर्तनाचा काळ सुरू आहे. जगामध्ये काय काय घडामोडी घडत आहेत ते आपण सर्व जण जाणतोच. भ्रष्टाचार, अनैतिकता, अशांती, युद्ध, पर्यावरणाची होणारी हानी, निसर्गाचे बिघडलेले समतोल, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवी मूल्यांचा झालेला ऱ्हास, ही सर्व कलियुगाच्या अंतिम टप्प्याची लक्षणे आहेत.

म्हणूनच शिव पिता परमात्मा आपल्याला जागृत करत आहेत मुलांनो आता जागे व्हा! मी तुम्हाला स्वर्गप्राप्तीचा मार्ग दाखवितो. आपली इच्छा असो वा नसो जावे लागणार प्रत्येकालाच. मग जाण्यापूर्वी आपले खाते सर्व ईश्वरी शक्तींनी व गुणांनी भरपूर करून का जाऊ नये? असे मानायला हरकत नाही की विश्वरूपी नाटकाची शेवटची घंटा वाजली आहे आणि आत्ताही जर आपण कुंभकर्णाच्या अज्ञान निद्रेतून जागे झालो नाही तर आपण रिकाम्या हातानेच ह्या जगातून परतू.

(पृष्ठ क्र. २६ वर)

# बोधकथा

ब्र. कु. उमेश, सांगली

आश्चर्याची गोष्ट ही आहे, की आपला ईश्वर दयेचा सागर आहे. करुणानिधान देव आहे. आपल्या केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप करणाऱ्यालाही तो लक्षेच क्षमा करतो.

**घणी गई, थोडी रही,**
**या में पल पल जाय।**
**एक पलक के कारणे,**
**यूँ ना कलंक लगाय।।**

**– संत कबीर**

एक राजा होता. अनेक वर्षे राज्य करीत असताना आता तो थकत चालला होता. त्याचे केस, चेहऱ्यावरील सुरकुत्या ह्याची ग्वाही देत होते. परंतु तरी त्याचे राज्य कारभार करणे चालूच होते. एकदा त्याने दरबारात एका उत्सवाचे आयोजन केले. आपल्या गुरुंना, तसेच मित्र देशींच्या सर्व राजांना ह्यात आग्रहाचे निमंत्रण दिले. उत्सव जास्त रसपूर्ण बनविण्यासाठी त्याने राज्याच्या प्रसिद्ध नर्तकीला कला सादर करण्यासाठी पाचारण केले होते.

राजाने काही सुवर्णमुद्रा (मोहरा) आपल्या गुरुजींना दिल्या, जेणेकरून नर्तकीच्या नाच-गाण्यावर प्रसन्न होऊन ते तिला बक्षीस म्हणून देऊ शकतील. रात्रभर नाचगाणे सुरुच राहिले. आता रात्रीचा प्रहर शेवटचा प्रहर संपून पहाट होणार होती. नर्तकीने जेव्हा बघितले की, तबलेवाला पेंगुळला आहे, तेव्हा त्याला जागवण्यासाठी तिने एक दोहा म्हटला...

**बहु बीती थोडी रही,**
**पल पल गई बिहाई।**
**एक पल के कारणे,**
**ना कलंक लग जाए।।**

आता ह्या दोह्याचा वेगवेगळ्या व्यक्तींनी स्वतःच्या (बुद्धी) कुवतीनुसार अर्थ काढला. तबलेवाला एकदम जागा होऊन तबला वाजवायला लागला. हीच गोष्ट (दोहा) राजाच्या गुरुजींनी ऐकली, तेव्हा त्यांनी त्यांच्याकडे राजाने ज्या सुवर्ण मोहरा दिल्या होत्या, त्या सर्व नर्तकीला देऊ केल्या. नर्तकीने जेव्हा पुन्हा हा दोहा म्हटला, तेव्हा (राजाच्या) राजकन्येने आपला नवलखा हार तिला दिला. ह्या दोह्यावर राजकुमारानेही आपला मुकुट नर्तकीला देऊ केला.

नर्तकी जेव्हा सारखे-सारखे हाच दोहा म्हणू लागली, तेव्हा राजा म्हणाला बास तू एक नर्तकी असून एका फुटकळ दोह्याच्या जोरावर सर्वांना लुटत आहेस.

राजाचे हे म्हणणे गुरूंनी ऐकले, तेव्हां त्यांच्या डोळ्यात पाणी आले, म्हणाले, ''हे राजा! तू जिला थिल्लर वेश्या म्हणतोस तीच माझी आता गुरू आहे. हिने माझे डोळेच उघडले. बघ, डोळ्यात झणझणीत अंजन घालून! मी आयुष्यभर जंगलात भक्ती करत राहिलो, आणि आयुष्याच्या ह्या शेवटच्या टप्प्यावर मात्र मी हे नाच-गाणे बघत आपली साधना, आयुष्यभराची कमाई नष्ट करण्याच्या बेतात आहे! हे काही बरे नव्हे! चला माझी निघायची वेळी झाली मी निघालो''- पण राजाने त्यांना थांबविले त्यानंतर राजकुमारी म्हणाली, ''बाबा, तुम्ही माझे लग्नाचे वय झाले, तरी माझ्या लग्नाचा विचारही करत नव्हता. म्हणून आजच रात्री मी तुमच्याच एका सरदाराबरोबर पळून जायच्या बेतात होते. परंतु नर्तकीच्या ह्या दोह्याने माझ्या बुद्धीचे टाळेच उघडले. वाटले कधीतरी तुम्ही माझे लग्न कराल हे नक्की. मग अधीर होऊन पळून जाण्यात, बापाला कलंक लावण्यात काय अर्थ!''

राजकुमार म्हणाला, ''बाबा, तुमचे इतके वय झाले तरी तुम्हाला राज्याचा मोह आहे. मी तुमच्याच शिपायांना बरोबर घेऊन कट केला होता. तुम्हाला नजरकैदेत टाकून स्वतःला राजा घोषित करणार होतो. पण ह्याच नर्तकीने मला समजावले. हिच्या दोह्याने माझ्या डोळ्यांसमोर

लख्ख प्रकाश आला. 'अरे कितीही झाले तरी मी एकुलता एक राजकुमार, शेवटी राज्य मलाच मिळणार आहे ना ! मग थोड्या वेळासाठी का आपल्याच बापाच्या शापाचे धनी व्हावे!'

राजाने तिघांचेही विश्लेषण ऐकले. तेव्हा राजालाही आत्मज्ञान मिळाले की, आपण आताच राजकुमाराचा राज्यतिलक केला तर! ह्या वेळी आपले गुरूही सभेत हजर आहेत. मग काय राजाने ही गोष्ट तात्काळ अमलात आणली. तसेच राजकुमारीला आश्वस्त केले की, 'मुली, मी लवकरच तुझ्यासाठी योग्य वर बघून तुझे लग्न अगदी थाटामाटात लाऊन देईन. ह्यावर गुरूजींनीही प्रसन्न होऊन आशीर्वाद दिला.

हे सर्व बघून नर्तकीने म्हटले, ''माझ्या एका दोह्याला ऐकून एवढे सर्व लोक योग्य मार्गावर आले. पण माझे काय! मीही सुधारायला हवे. आजपासून मी माझा हा नाच-गाण्याचा धंदा बंद करून प्रभुसेवेत लागणार हे नक्की. हे देवा! आजपासून मी तुझ्या नामजपातच आपले आयुष्य व्यतीत करणार हे माझे तुला वचन आहे.''

***

---

(पृष्ठ क्र. २४ वरून)

आता आपल्या बुद्धीला चारी बाजूंनी आवर घालून ती केवळ परमेश्वरावरच एकाग्र करायला हवी. आणि आपल्या गाठोड्यात चांगले कर्म व संस्कार भरून घ्यायला हवेत. अन्यथा एखादा माणूस जर निषिद्ध वस्तू (उदा.-अफू, दारुगोळा, शस्त्र इ.) घेऊन जात असताना मार्गात पकडला गेला तर त्याला शिक्षा होते. त्याच प्रमाणे ह्या जगातून प्रयाण करताना काम, क्रोध इ. विकार घेऊन जात असताना जर एखादा आत्मा धर्मराजपुरीमध्ये पकडला गेला तर त्याला शिक्षा भोगावी लागेल. म्हणून ह्या जन्मी व पुढील जन्मी गुण्यागोविंदाने नांदण्यासाठी श्रेष्ठ ज्ञान व कर्माचे उत्तम बीज आत्ताच पेरावे हेच श्रेयस्कर ठरेल.

आधी म्हटल्याप्रमाणे मृत्यूशय्येवर असताना ऐकलेले गीता ज्ञान केवळ एक कर्मकांड आहे. जर आपल्याला खरेच स्व-परिवर्तन आणायचे असेल तर त्यासाठी आत्ताच हे ज्ञान अभ्यासून अंगीकारले पाहिजे. जेव्हा आपण निरोगी आहोत तेव्हाच परमपिता परमात्म्याचा व आत्म्याचा स्पष्ट परिचय आपल्याला करून घ्यायला हवा. आणि त्या योगे परमात्मा शिवाशी योग जुळवून स्वतः मध्ये आत्मिक बळ भरायला हवे. हे ईश्वरी ज्ञानच पतित पावनी गंगा आहे त्याद्वारे आत्मा पावन होईल. नुसती सत्यनारायणाची कथा ऐकून नराचा नारायण होत नसतो. त्यासाठी सततचा योगअभ्यास व दिव्य गुणांची धारणा करणे जरुरीचे आहे. असे मानवच ह्या अंतिम जन्मात पवित्र बनून मृत्यू समयी त्या शिव परमात्म्याच्या स्मरणात राहिल्याने मुक्ती व जीवन मुक्ती प्राप्त करू शकतात.

फक्त अंतकाळीच नव्हे तर ह्या जीवनरुपी प्रवाहात असतानासुद्धा आत्म्याची ज्योत प्रज्वलित करणे आवश्यक आहे. असा तेवणारा आत्मा रुपी दिवाच जीवनात येणाऱ्या अंधकाररूपी संकटात स्वतःची वाट शोधून मार्गक्रमण करत राहतो.

मग ही सर्व साधना करण्याची योग्य वेळ तरी कुठली आहे? आज प्रत्येक मनुष्य व्यग्र आहे. मरायला सुद्धा वेळ नाही असे उद्‌गार तो काढतो. पण जरा विचार करूया आपला सगळा वेळ कुठे खर्च होत आहे? दैनंदिन कामकाजासाठी लागणारा वेळ तर सर्वांना द्यायलाच हवा. पण लक्षपूर्वक पाहिल्यास आपल्याला नक्कीच जाणवेल दिवसातून बहुतांश वेळ हा आपला व्यर्थ विचार किंवा चिंता करण्यात जात आहे. त्या ऐवजी जर आपण काही वेळ वाचवून हे ज्ञानकण वेचले तर आपल्या मनावरचा ताण कमी होऊन आपण नक्कीच एका वेगळ्या विचारधारेचा अंगीकार करू शकू. ह्या साधनेने आपल्याला दिव्य बुद्धी लाभेल त्याद्वारे आपण आयुष्यात येणाऱ्या अडी-अडचणी, संकटांवर मात करून आपल्या ध्येयापर्यंत पोचू शकतो.

शिव परमेश्वर स्वतः ह्या पृथ्वीवर, ह्या भारतवर्षात अवतीर्ण होऊन ज्ञान देत आहेत. त्वरा करा, सृष्टी परिवर्तनाची घटिका समीप येऊन पोचली आहे. आणि सृष्टी परिवर्तन होण्याआधी आपल्याला स्व-परिवर्तन करून त्या पित्याशी आपला संपर्क जोडायचा आहे.


***

**सुविचार**

शरीरावर प्रेम असेल तर, त्यासाठी आसन करा, श्वासांवर प्रेम असेल तर, प्राणायाम करा, आत्म्यावर प्रेम असेल तर, ध्यान करा, आणि परमात्म्यावर प्रेम असेल, तर समर्पण करा.

# स्पार्कमधील अनुभव

ब्र.कु. स्वामीनाथन, कोची



दक्षिण भारतातील बाबांच्या एका सेवाकेन्द्रावर सकाळची मुरली सुरु असताना एक वयोवृद्ध माता रोजच उशिरानी यायची. आणि मुरली संपायच्या आतच निघून जायची. यायची उशिरा आणि जायची मात्र मुरली पूर्ण व्हायच्या आधीच! आणि तिचा एक नियम होता. जाता-जाता दानपेटीत १ रुपयाचे नाणे टाकूनच जायची. त्याचा टणटण असा आवाज क्लासच्या त्या शांततेत जास्तच जाणवे. त्यामुळे सर्वांनाच न बघताही कळे की ह्या मातेने पेटीत पैसे टाकलेत. हा तिचा नियम म्हणजे नियम होता - उशिरा यायचे, लवकर जायचे, टण्ण्ण् आवाज करत पैसे टाकायचे. त्यामुळे तिकडच्या निमित्त दीदींनी एका वयस्कर भावाला सांगितले की, ह्या मातेला जरा समजवा. भाईजी म्हणाले, ''बरं मी सांगून बघतो.'' मग एक दिवस त्या भावाने मातेला थांबवून रोजचा तिचा नियम आठवण करून सांगितले. तुम्ही उशिरा येऊन लवकर जाता वगैरे ठीक आहे, पण तो नाण्याचा आवाज सगळ्याच क्लासला विचलित करतो बघा. त्यावर मातेने विचारले, ''मग मी काय करावे अशी आपली इच्छा आहे?'' त्यावर भाऊ म्हणाले, ''तुम्ही एक काम करता का १० तारखेला, २० आणि ३० तारखेला १० रुपयाची नोट टाका, म्हणजे त्या नोटेचा आवाज तरी येणार नाही.''

माता म्हणाली, ''भाईजी मला क्षमा करा. मी उशिरा येते कारण मी सकाळी-सकाळी इडली सांबार करून गाडी लावते. इडली सांबार तयार करता-करता मला उशीर होतो. मग ८ वाजता गाडी सुरू करायची असल्याने मी लवकर जाते.'' तरी ते भाऊ त्यावर म्हणाले, ''अच्छा मला हे कळले, पण तुम्ही ते नाणे टाकता ना, त्याचा आवाज होतो त्याने सर्वांनाच त्रास होतो, म्हणूनच मी तुम्हाला १०, २०, ३० तारखेला १०-१० रुपये टाका असे म्हटले.'

माता म्हणाली, 'भाईजी, गुरुवारी सेवाकेन्द्रात बाबांचा जो (भोग) प्रसाद दिला जातो, तो मी खाते, त्याचा खर्च, सेवाकेन्द्राच्या खुर्चीवर बसते मुरली ऐकते. योग करते त्या खुर्चीचा खर्च, वर पंखा चालू असतो, वीजेवरचा बाबांचा फोटो, लाल-पांढरे दिवे ह्यांचा खर्च, मधुबनहून जी मुरली पोस्टाने येते, त्याचा खर्च... विचार करा. मी जर ८ ताखेलाच मेले, तर माझ्या डोक्यावर किती ओझे चढेल? ते तुम्ही उतरवाल का?' रोज मी बाबांच्या घरातील सुविधा वापरते, मी जमेल तसे धन सफल करते.

त्या भावाला मातेचे हे विचार ऐकून भोवळ यायचीच बाकी होती. ही माता दिसते किती साधारण - पण वैचारिक पातळी किती प्रगल्भ! बाबा, ब्राह्मण परिवार, निमित्त दीदी ह्यांच्या स्नेहाचा परतावा आपण कधी आणि कसा देणार! आपण आपलेच भाग्य बनवतोय, भविष्यासाठी जमा करतोय. ब्राह्मण जगताचा आधारच संकल्प करणे होय. आपण फक्त संकल्प करावा. बाकी सर्व काही आपोआप घडत जाणार ह्यावर विश्वास ठेवा.

***

## आयुष्य आनंदी करा

कितीही मोठा डोंगर कोसळू द्या. माणसाने आतून मजबूत असावे. काहीही नसले तरी आनंदी राहा. आपल्यातील आनंदच आपल्याला सर्व काही मिळवून देईल. जे स्वतः आनंदी असतात, ते इतरांनाही आनंदी करतात. हाती काही नसले तरी आनंदी राहण्याचा प्रयत्न करा. त्याद्वारे आहे त्यात समाधानी राहू लागाल. जो स्वतः आनंदी असतो तो इतरांनाही नकळत आनंदी करत राहतो. मिळालेल्या आयुष्याबद्दल ज्याच्याकडे कमीत कमी तक्रारी असतील. तोच सर्वात सुखी असेल.



# जरा विचार करून पहा

**ब्र. कु. साहेबराव, पाबळ**

आपल्या योजना काम करत नाहीत, अथवा पूर्णत्वास जात नाहीत, असे तुम्हाला वाटते का?

सुनिता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर यांना जाताना वाटले की, आपण फक्त ८ दिवसांकरिता अंतराळात जातोय. पण ते दोघे तेथेच २८६ दिवस अडकून राहिले.

जरा विचार करा - आपण एखाद्या छोट्या सहलीसाठी निघावे, आणि तेथून परततानाचा मार्ग एवढा कठीण असावा की यायला कोणतेही वाहन नसावे, ना धड पाणी, ना खाण्यायोग्य पदार्थ, ना मोकळा श्वास घ्यायला ताजी शुद्ध हवा! आपण अशा वेळी घरी कधी पोहोचू ह्याचीही स्पष्ट कल्पना नसावी.

आपण ना बऱ्याच वेळा आपला संयम येथेच संपवितो -

१) जेव्हा थोड्या-थोड्या ५-१० मिनिटांच्या ट्रॅफिक जॅममध्ये अडकतो, ज्यामुळे त्याचा चिडचिडेपणा दिवसभर जाणवत राहतो.

२) एखाद्या नोकरीच्या ठिकाणाहून आलेला नकार आपण सहजासहजी पचवू शकत नाही.

३) कामाच्या ठिकाणी काही गोष्टींना व्हायला उशीर लागतो, आणि आपण आपले मन खट्टू करून घेतो.

**दृष्टिकोण**

अंतराळ वीरांचे त्यांच्या परिस्थितीवर नियंत्रण नव्हते. परत केव्हा जायला मिळेल कशाचीच आशा नव्हती. २६८ दिवस (हेही अनिश्चितच दिवस) त्या परिस्थितीशी जुळवून घेणे, अशा वेळी मनाला शांत ठेवणे आणि होणाऱ्या प्रक्रियेवर (पृथ्वीवरून आपल्या सुटकेसाठी प्रयत्न करणाऱ्या नासाच्या वैज्ञानिकांवर) विश्वास ठेवणे अति आवश्यक होते.

आणि त्यांनी ते सर्व शक्य करून दाखविले. म्हणून अशा कठीण परिस्थितीत संयम, सहनशीलता आणि मात करण्याची कला अत्यंत आवश्यक असते.

अशा ह्या गुणी अंतराळवीरांना, दिग्गजांना, ज्यांनी इतिहास घडवला अशा मातब्बरांना शंभर तोफांची सलामी!

आता आपल्यावर एखादा प्रसंग ओढावल्यास लक्षात असू द्यावे - किमान आपण अंतराळात तरी अडकलो नाही. आयुष्याला वेगळे अनपेक्षित वळण लागेल. आपल्या योजना बारगळतील (बाजूला पडतील), गोष्टींना, कामांना अचानक विलंब लागेल. पण जर हे अंतराळवीर ८ दिवसांऐवजी ९ महिने अंतराळातत जिवंत राहून सुखरुप परत येऊ शकतात, तर तुम्ही आणि मी एखाद्या परिस्थितीवर का नाही मात करू शकणार! विचार करा...

***

## सुविचार

* स्वत:ला कधीही कमी लेखू नका. तुमच्या आत्म-विश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होतील. स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवा, त्यामुळेच तुमची स्वप्ने पूर्णत्वास जातील.
* अपयश ही यशाची पहिली पायरी होय. तर स्वत:वरील विश्वास ही यशाची पुढील पायरी आहे.
* किनाऱ्याची दृष्टि गमावण्याचे धैर्य होत नाही, तोपर्यंत आपण नवीन क्षितीजाकडे झेपाऊ शकत नाही.
* आजचा संघर्ष, उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो. विचार बदला, आयुष्य बदलेल.
* पराभवाने माणूस संपत नाही पण प्रयत्न सोडतो, तेव्हा मात्र तो संपतो.

कठीण काळात सतत स्वत:ला सांगा - की 'शर्यत अजून संपलेली नाही, कारण मी अजून जिंकलेलो नाही.